वगनाट्य

# वैरी भेदला

अर्थात

## प्रेमाला सीमा नाही.

शाहीर पाषाणभेद
– सचिन बोरसे





'वैरी भेदला' या पुस्तकाचे लेखक शाहीर पाषाणभेद उर्फ़ सचिन बोरसे हे आहेत. 'अमिगो पब्लिशर' यांनी ते २०१७ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना हे ई पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

शाहीर पाषाणभेद उर्फ़ सचिन बोरसे:

WhatsApp मोबाईल: 9823402554

email: sachinborse@gmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

# वैरी भेदला

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखक सचिन बोरसे यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**ई प्रकाशन : २३ जून २०२१**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

विनोदी लोकनाट्य

# वैरी भेदला

अर्थात

# प्रेमाला सीमा नाही

शाहीर पाषाणभेद - सचिन बोरसे

प्रकाशकः अमीगो पी.ओ.डी. बूक पब्लिशर इंडिया
८, गिरीष अपार्टमेंटस, दीपाली नगर, नाशिक
४२२००९ महाराष्ट्र
मोबाइलः ९४०३०४३७८२

Publisher: Amigo POD Book Publisher India
8, Girish Apts. Dipali Nagar, Nashik- 9, Maharashtra
Email: AmigoPublisher@gmail.com  Mobile: 9403043782

विनोदी लोकनाट्यः वैरी भेदला अर्थात प्रेमाला सीमा नाही
लेखकः शाहीर पाषाणभेद - सचिन बोरसे
**Vinodi Lok-Natya: Vairi Bhedala Arthat Premala Seema Nahi**
(Comedy Folk Drama in Marathi Language)
Category: Comedy-Folk Drama

Author: Shahir Pashanbhed - Sachin Borse
Copywrite (C): Mrs. Archana Borse
5, Yogi Park Row House, Laxmi Nagar, Mahale Farm,
Ranapratap Chowk, CIDCO, Nashik, 422009
Mobile: 9823402554 Email: SachinBorse@gmail.com

प्रकाशकः अमीगो पी.ओ.डी. बूक पब्लिशर इंडिया, नाशिक, महाराष्ट्र
Published By: Amigo POD Book Publisher India, Nashik, Maharashtra
Email: AmigoPublisher@gmail.com Mobile: 9403043782

मुद्रकः रिप्लिका प्रिंटर्स, नाशिक मुद्रित-शोधनः सौ. अर्चना बोरसे
Printers: Replica Printers, Nashik Proof Check: Mrs. Archana Borse
मुखपृष्ठ रचनाः श्री. घनश्याम देशमुख, बोलक्या रेषा, पुणे
Cover Page Designer: Shri. Ghanashyam Deshmookh, Pune
वितरणः ऑनलाईन Distribution: Online / www.amazon.in
प्रकाशन दिनांकः प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी, २०१७
Publication Date: Republic Day, 26 January. 2017

ISBN: 978-93-5267-770-2
Category: Comedy-Folk Drama
Edition: First

Price: Rs. 65/-

**अर्पणपत्रिका:**

तुम्हां सर्व रसिक वाचकांना आणि लेखन करतांना हुरूप देत आपुलकीचे नाते जपणाऱ्या MisalPav.com, AisiAkshare.com, MaayBoli.com येथील संचालक, सभासद यांना सविनय अर्पण.

**घोषणाः**

या वगनाट्यातील सर्व व्यक्ती, नावे, पात्रे, स्थळे आणि प्रसंग काल्पनिक आहेत. त्यांचा कोणाही जीवित अथवा मृत व्यक्ती, राजे, संस्था, राजकीय पुढारी, त्यांचा कारभार आदींशी तसेच कोणत्याही दैवतांशी साम्य नाही. तसे आढळल्यास निव्वळ योगायोग समजावा.

**सूचनाः**

सर्व हक्क लेखकास्वाधीन. भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कॉपीराईट कायद्यान्वये संरक्षित. या पुस्तकाचा कोणताही भाग पुनःमुद्रीत, फोटोकॉपी, इलेक्ट्रॉनिक, नाट्य अथवा चित्रपट यांसाठी वापरण्यास लेखकाची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक आहे.

**प्रमुख भूमिकाः**

शाहीर, सोबती, पेंद्या, किसनदेव, मावशी, राधा, गवळणी, राजा, राणी, राजपूत्र, प्रधान, हवालदार, शिपाई, राजपुत्री, दिवाणजी, हुजऱ्या, भालदार, चोपदार, दासी, नर्तिका आदी.

## मनोगतः

लोकनाट्य रसिकांना मानाचा मुजरा.

इंटरनेट माध्यमात सर्वात प्रथम प्रकाशित होणारे "वैरी भेदला अर्थात प्रेमाला सीमा नाही" हे वग असलेले लोकनाट्य संपूर्णपणे नव्याने लिहून आता पुस्तक रूपाने आपल्या हातात देतांना मनस्वी आनंद होत आहे. इंटरनेटवर सर्वात प्रथम प्रकाशित, कागदावर प्रथमतः खर्डा न लिहिता, इंटरनेटवरील देवनागरी वर्ड एडिटरचा वापर करून लिहिल्या गेलेले आणि इंटरनेटवर पूर्ण संहितेत उपलब्ध असणारे हे एकमेव लिखित वगनाट्य आहे. पोवाडे, भक्तीगीते, कथा, गाणी आदी सोशल मिडीयाचा उदय होण्याआधीपासून करत असल्याने ते सारे साहित्य कागदावरच लिहिलेले होते. निरनिराळया आयटी कंपन्यांमध्ये काम करत असल्याने नेहमी इंटरनेटशी संपर्क असे. त्यामुळे आपल्याही काही रचना ब्लॉगच्या स्वरूपात रूपांतरीत कराव्या असे वाटले. जुन्या काळात ऑनलाईन वर्ड एडिटर्समध्ये देवनागरी फॉन्ट्स जास्त नसल्याने किंवा असलेले जास्त किचकट असल्याने आणि वेळेअभावी मराठी-देवनागरी टंकलेखन करण्यास हात धजावत नव्हते. त्यामुळे कागदावरच्या रचना संगणकात आणि इंटरनेटवर कधी गेल्या नव्हत्या. अशाच वेळी माझा संपर्क MisalPav.com या मराठी साहित्याशी संबंधीत असणाऱ्या वेबसाईटशी झाला. येथील सभासदांशी समोरासमोर कधी न भेटलेलो नसतांना देखील जिव्हाळयाचे नाते जमले. या वेबसाईटवर आपण जसे बोलतो तसेच टंकलेखन करणारा सोपा वर्ड एडिटर 'गमभन' हा आहे. त्यामुळे देवनागरी टंकलेखन करणे सोपे झाले. त्यानंतर यथावकाश पुस्तकाचे काम मार्गी लागले. सदर लेखन टंकलिखीत करण्यासाठी किरण फॉन्ट्स वापरला आहे. किरण फॉन्ट्सचे श्री. किरण भावे यांचे याकामी

सहकार्य मिळाले. श्री. घनश्याम देशमुख यांनी मुखपृष्ठाचे काम लवकरात लवकर पुर्ण केले. मित्र सर्वश्री. गिरीष सोनवणे, तुषार कुलकर्णी, मंदार याळसंगीकर यांनी वेळोवेळी पुस्तकाच्या प्रगतीची विचारपूस करून लेखनास प्रवृत्त केले. ऑनलाईन मराठी कम्युनिटी वेबसाईट्स वरील मित्र - सुहास साळवे, जयपाल पाटील, प्रसन्न केसकर, विशाल विजय कुलकर्णी, चित्रकार शरद सोवनी (चित्रगुप्त), प्रमोद देव, प्रा. डॉ. दिलीप बिरूटे, चंद्रशेखर अभ्यंकर (तात्या), कैवल्य देशमुख, मदणबाण, प्रसाद ताम्हणकर (परा), सागर भंडारे, राजेश घासकडवी, पराग दिवेकर, राज जैन व इतरांनीही यांनी लेखनकामी प्रोत्साहन दिले. पत्नी अर्चनाने शाळेची नोकरी आणि घरकाम यातून वेळात वेळ काढून मुद्रित-शोधन करून दिले. रिप्लीका प्रिंटर्सचे श्री. नरेंद्र शालीग्राम आणि कर्मचारी यांनी मुद्रणकामात सहकार्य केले. वर उल्लेखिलेल्या सर्व व लेखनकामी सहकार्य लाभलेल्या इतर सर्वांचे आभार.

प्रस्तुत वगनाट्य लिहील्यानंतर पुनःलेखन करून नवीन स्वरूपात तब्बल चार वर्षांनंतर आता पुस्तकरूपाने आपल्या समोर येत आहे. हे वगनाट्य आपणास आवडेल याची खात्री आहे.

- सचिन बोरसे (पाषाणभेद)

**प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी, २०१७**

**नाशिक**

## प्रस्तावनाः
## - लोकनाट्याच्या निमित्ताने -

जुन्या जमान्यातील अस्सल मराठमोळा असणारा तमाशा आधुनिक काळात लोकनाट्य म्हणून गणला जावू लागला. दूरचित्रवाणी येण्यापूर्वीच्या कालखंडात तमाशा हे खेड्यातील जनतेचे एक मनोरंजनाचे साधन होते. तमाशाच्या उत्कर्षाला मराठी चित्रपटसृष्टीही कारणीभूत ठरली. पिंजरा, सांगते ऐका, केला इशारा जाता जाता, सवाल माझा ऐका, गण-गवळण, नटरंग आदी काही तमाशापटांचे प्रातिनिधिक उदाहरणे. चित्रपटातील तमाशापेक्षा गावजत्रेतील पालातील तमाशा हे एक वेगळेच रसायन होते. तेथे गण, गौळण, लावणी, बतावणी आणि कथानक असलेला वग यांचा मिळून तमाशा होई. आताच्या युगात तमाशा कलावंत लोप होत चालले आहेत. अस्सल लोकनाट्य तमाशा केवळ जत्रेतील बारीपूरताच मर्यादीत राहतोय की काय असा प्रश्न पडू शकतो. शहरांमधील असणाऱ्या थिएटर्समध्ये पूर्ण संहिता असणारे वगनाट्य पहायला मिळत नाहीत. केवळ बतावणी सादर करून उरलेल्या वेळात चित्रपटातील लावण्या या 'डान्स' स्वरूपात सादर केल्या जातात. कधी कधीतर त्यात डिस्कोही असतो ! पुढील पिढीला 'हाच तमाशा असतो' असे म्हणावे लागेल. रसिक प्रेक्षक त्या नाट्याच्या वाट्याला येत नाहीत. एकतर दमदार संहिता असूनही रंगमंचावर सादर होत नाही आणि प्रेक्षकांची अभिरूची बदलली म्हणून मागणी तसा पुरवठा या न्यायाने लोकनाट्य-वगनाट्य केवळ गाण्यांच्या स्वरूपात पाहिले जाते. थोडक्यात आताशा लोकनाट्याच्या अंगाने रंगभूमीवर सादर होणारे लोकनाट्य हे खरे लोकनाट्य नाहीच. एकतर सुजाण प्रेक्षक नाहीत म्हणून लोकनाट्याच्या

नवनवीन संहिता रंगमंचावर येत नाहीत अन सर्वांगाने सजलेले वगनाट्य रंगमंचावर येत नाही म्हणून त्यांना रसिक प्रेक्षक नाही असे एकमेकांवर अवलंबून आहे. त्यातच आताच्या ऑनलाईनच्या युगात मनोरंजन माध्यमांचा सुकाळ झालेला आहे. कालाय तस्मै नमः असो. तुमची लाडाची मैना, विच्छा माझी पुरी करा, गाढवाचे लग्न आदींसारख्या समग्र संहिता असणाऱ्या वगनाट्यांची लड जर रंगमंचावर लागली तर त्या होणाऱ्या आतषबाजीत रंगभूमी उजळून निघेल.

तमाशा, लोकनाट्य, वगनाट्य आदी निरनिराळी नावे जरी वापरली तरी लोकनाट्याचा मूळ गाभा ग्रामीण शैलीत फार्सीकल मनोरंजन हाच आहे. लोकनाट्य सादर करण्यासाठी मोठ्या खर्चाच्या सेट्सची आवश्यकता नसते. रंगमंचाचा केवळ मागचा पडदा बदलता रंगमंच क्षणात महाल तर क्षणात युद्धभूमी होतो. एखादे नाटक सादर होण्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या दृष्टीने हा एक फायदाच असतो.

प्रस्तुत लोकनाट्य कमी कालावधीचे आणि वगनाट्याची सारी अंगे जशी - गण, निरनिराळया गौळणी, बतावणी, लावणी, वगनाट्य असलेले आहे. वगनाट्याचे प्रयोग करतांना प्रासंगिक, स्थल-कालाचे भान ठेवून कलकार पदरचे संवाद टाकू शकतात. या नाट्याच्या शेवटी परिशिष्टात आणखी काही गण आणि गौळणी दिल्या आहेत. त्यांचाही उपयोग करता येवू शकतो.

या लोकनाट्याचे प्रयोग महाविद्यालयांचे स्नेहसंमेलने, निरनिराळ्या नाट्यस्पर्धा, कंपन्यांची स्नेहसंमेलने आदी ठिकाणी व्हावेत असे ''वैरी भेदला अर्थात प्रेमाला सीमा नाही'' या लोकनाट्याच्या निमित्ताने सांगावेसे वाटते. प्रयोगाच्या आधी केवळ एक इमेल, व्हाट्स अप सारखा मेसेज करून किंवा फोन करून (आताशा पत्र कोण लिहितो?) प्रयोगाचे तपशील, कलावंतांची नावे

कळवावीत जेणेकरून त्याची लिखित नोंद ठेवता येईल.

समयसूचकता, सभाधीटपणा, संवादकौशल्य, जनसंपर्क आदी स्वयंगुणविकासासाठी नाट्यकला उपयोगी आहे. नाट्यकलेतूनच पुढील पिढीचे कलावंत मिळतात. अशा या नाट्यकलेस आणखी वैभव लाभण्यासाठी आपण साऱ्यांनी प्रयत्न करूया.

- सचिन बोरसे (पाषाणभेद)

**पडदा उघडतो तेव्हा शाहीर गण गातात.**

**गण**

(चाल पारंपरीक)

देव गौरीनंदन आधी वंदूया
शुभ कार्याची सुरूवात करूया ।।धृ।।
रसिक जमले आम्हांसमोरी
तुझेच रूप जणू शेंदरी
उशीर नका लावू देवा
झडकरी या या
शुभ कार्याची सुरूवात करूया ।।१।।
रिद्धी सिद्धीचा तू रे स्वामी
तूज पूजितो कलावंत आम्ही
मंगल कार्याआधी
गणाला गावूया
शुभ कार्याची सुरूवात करूया ।।२।।
देव गौरीनंदन आधी वंदुया
शुभ कार्याची सुरूवात करूया ।।धृ।।

**सोबतीः** वा वा शाहीर, गण तर लई फसक्लास झाला. आक्षी आदर्श अन् कॅम्पाकोला झाला बघा. मन लई प्रसन्न झालं. आता परंपरेप्रमाणं गणानंतर बतावणी अन् गौळण बी झ्याक होवूं द्या. पब्लीक कसं खूष झालं पाहिजे! असं खूष, असं खूष की त्यांनी सगळे घोटाळे, महागाई, प्रेटोल दरवाढ, भारनियमन, दुष्काळ, कोरडी धरणं, मुख्यमंत्री बदलाबदली समदं विसरायला पाहिजे, काय?

**शाहीरः** असं म्हणता! मग होवून जावूदे!

**बतावणीः**

**(शाहीर अन सोबती विंगेत जातात आणि बतावणी सुरू होते.)**

**(ढोलकी वाजते अन त्या तालावर दोन-तीन गौळणी नाचतात. यात राधा नसते. ती नंतर येते.)**

**गौळणः**

आम्ही गवळण नारी जातो बाजाराला
दूध दही लोणी तूप विकायाला
आम्ही गवळण नारी जातो बाजाराला ॥धृ॥
अल्लड आम्ही सख्या
खेळ खेळलो बालपणी
आता भरली ज्वानी
उडतो पाखरावानी
आम्ही गवळण नारी जातो बाजाराला ॥१॥
साडीचोळी नेसली अंगाला
गजरा माळूनी ग डोक्याला
हातात काकणं ल्याले
कमरपट्टा बांधूनी कमरेला
आम्ही गवळण नारी जातो बाजाराला ॥२॥

**(ढोलकीचा तोडा सुरू होतो अन् त्या ठेक्यावर डोक्यावर माठ घेतल्याच्या आव आणत मावशी येते.)**

**मावशीः** राधे, अग राधे, चल निघ ना बाहेर. आतमधी काय करू ऱ्हायलीय? तिकडं मुन्नी बदनाम व्हईल ना! चल लवकर मथुरेच्या बाजारला.

**राधाः** (विंगेतून राधा बाहेर येते) मावशे, अग तुझ्या जिभंला काही हाड आहे का नाही? माझ्या उशीरा येण्यानं मुन्नी बदनाम कशी गं होईल?

**मावशीः** अग राधे, तुझ्या असं उशीर करण्यामुळं मुन्नी गवळणीचं दूध बाजारात विकाया नेण्याच्या आधीच नासलं तर ती बदनाम व्हईल असं म्हनायचं होतं मला. चल आता लवकर. तो दूधाचा माठ घे डोक्यावर अन् निघ. म्होरल्या चौकात मुन्नी अन् शीला गवळणी वाट बघत असतील. तू चल म्होरं मी शब्बो शहाबादीलाबी संगती आणते.

**(रंगमंचाच्या एका कोपऱ्यात दोन गवळणी उभ्या आहेत.)**

**गवळण १:** या बया, लई येळ झाला की ग. व्हाट्स ॲपवर राधा अन् मावशीला मॅसेज करूनसुद्धा त्या दोघी येईना बघ.

**गवळण २:** मला तर वाटतं मावशीला कुणीतरी भेटलं असेल अन् मावशी बसली असेल. तिला जिथं तिथं बसायची लई वाईट खोड आहे बघ. ते जावू दे. ही माझी साडी कशी दिसतीय गं?

**गवळण १:** लयीच भारी आहे ग. कोणत्या कोमटीणीकडून घेतली ग?

**गवळण २ (रागावून):** असं काय ग तुझं? तुला काही चांगलं सहनच होत नाही बघ.

**गवळण १:** अगं मी सहजच बोलले. राग नको करू. चल आपण शेल्फी शेल्फी खेळूया.

**(दोघी तोंडे वेंगाडून एकमेकींच्या मोबाईल फोन मध्ये सेल्फी काढत बसतात. तेवढ्यात तेथे मावशी राधाला घेवून येते.)**

**मावशीः** ये पोरींनो, मी आले बघा. मी काय शेंट्रल रेल्वे हाय का उशीरा यायला? अन् का गं, ह्ये काय शेल्फी शेल्फी खेळत बसला? ही काय राधा बी आलीच. जमल्या ना सगळया? मुन्नी, शीला, शब्बो तुम्हीबी हायेत ना. मला वाटलं तुम्ही कुठं आयटम डॅन्सलाच गेल्या का काय?

**राधाः** मावशे आम्ही सगळ्यांनी दही, दूध, लोणी डोक्यावर घेतलंय. तू ग काय घेतलंस बाजारात विकायला?

**मावशीः** मला काही विकायला लागत नाही. मलाच कोणी विकत घेतयं

का ते पहायला मी बाजारात चालले. (तोंड वेंगाडून) हें हें हें म्हनं, 'तू ग काय घेतलंस बाजारात विकाया?' त्या भुजबळाची चौकशी करत्यात तसं तू विचारू राह्यलीस जणू. हं, चला गं बिगी बिगी.

**गवळण २:** मावशे, जरा हात लाव गं?

**(मावशी गवळणीलाच हात लावालया निघते.)**

**गवळण २:** ए मावशे, अग मी माझ्या ह्या माठाला हात लावायला सांगितला, मला नाही.

**मावशी:** मग तू कुठं तसं सांगितलं? आता लावते तुझ्या माठाला हात. ए बाकीच्या साळकायांनो, तुम्ही का तोंड बघून राहिल्यात? चला लवकर. नाहीतर बाजार सापडायचा नाही. चला माझ्या मागं, मी होते तुमच्याम्होरं.

**(सर्व जणी डोक्यावर दह्या-दूधाचे माठ घेतल्याचा अभिनय करत रंगमंचावर गोल गोल फिरतात. तेवढ्यात पेंद्या येतो.)**

**पेंद्या:** इश्टाप! इश्टाप!! इश्टाप!!!

**मावशी:** ए मुडद्या काय "इश्टाप इश्टाप इश्टाप" करतोया? इथं काय लपाछपीचा खेळ चालू आहे का?

**पेंद्या:** "इश्टाप इश्टाप इश्टाप" म्हंजे इंग्रजीत "Do not Start". मी बी आता 'हासुरे' झटपट इंग्रजीचा क्लास लावलेला आहे सध्या.

**गवळण १:** ये बाबा, काय 'मन की बात करतोय' त्या मोदीवानी? जरा माय मराठीत समजल असं बोल. नायतर मनसे बोलाया लावीन बघ.

**पेंद्या:** अग बायांनो, मराठीत बोलतो, "थांबा! थांबा!! थांबा!!"

**मावशी:** पाळणा "लांबवा लांबवा लांबवा".

**राधा:** बरं आम्ही थांबलो. तुझं म्हणनं तरी काय ते तर सांगशील? का तुला आमचं दही दूध विकत घ्यायचंय?

**पेंद्या:** बरोबर. मला तुमच्यावालं दही दूधच पाह्यजेल. पन विकत नको.

**मावशीः** आमच्यावालं दही दूध? येतोस का कोपच्यात? मग देते तुला माझ्यावालं दही दूध.

**पेंद्याः** ये बाबो. (घाबरतो). अग तुमच्यावालं म्हणजे तुमच्या डोक्यावरल्या माठातलं दही दूध म्हणायचं होतं ग मला.

**मावशीः** मग, सरळ बोल की मेल्या. अन् काय रे, तू कोण? अन् आम्हाला का अडवितो?

**पेंद्याः** मी पेंद्या आहे किसनदेवाचा. अन् मी सरकारी शेवक आहे. माझ्या ह्या खाकी डेरेसवरनं तुम्ही वळखलं नाही? अहो खाकी म्हंजे खा-की. नाशिकच्या महानगरापालिकेत सरकारी माणसं येईल ते खात्यात म्हणून आमच्या डेरेसचा रंग बी खा-की असलाच ठेवलाय. किसनद्येवानं सांगितलय की ह्या वाटनं कोण बी, बाई म्हणा, मानूस म्हणा - जो कोणी आपआपलं सामानसुमान घेवून जाईल त्यांना कर भरावा लागलं. (गौळणींना गोल चक्कर मारत निरखत बोलतो) म्हंजे सामान्य मराठीत हप्ता भरावा लागल.

**मावशीः** अरे तू म्हणतुयास "कोण बी बाईमानूस सामानसुमान घेवून जाईल त्यांना कर भरावा लागलं". माझ्याकडं काय बी सामान नाही तर मी जावू का?

**गवळण १ः** मावशे तुझ्याकडं काही सामानसुमान नसेनाका. पण आम्हाला मथुरेच्या बाजाराला नेण्याची जबाबदारी तुझ्याकडं आहे हे विसरली का काय?

**मावशीः** अग माझे बाई, मी हा पेंद्या किती पाण्यात आहे ते पाहण्यासाठी त्याची परीक्षा घेत होते.

**पेंद्याः** तर थोडक्यात तुम्ही बायांनी इथं टॅक्सच्या रुपात कायतरी द्यायला पाहिजे. आपला टॅक्स वेळेवर भरा व राष्ट्राच्या विकासात सहभागी व्हा. हजार पाश्शेची जुनी नोट अन् दोन हजाराची नोटही

चालणार नाही. सुट्टे पैसे चालतील. ही सूचना इन्कम टॅक्स डिपार्टमेंटकडून अन् अर्थमंत्री जेटली यांच्या सांगण्यानुसार जनहितार्थ प्रसारीत. सूचना समाप्त.

**मावशी (लाडात आल्याचे नाटक करत):** ए माझ्या सोन्या, ए माझ्या चांद्या, ए माझ्या रुप्या, ए माझ्या हिऱ्या, ए आरएमद्या, ए गोव्या, ए विमल्या, ए गुटक्या असं काय करतो? आम्हाला जावू दे ना. का खळ्ळ्ळ खटॅक करू?

**पेंद्या:** नाही म्हंजे नाही, अजिबात नाही.

**राधा:** अजिबात नाही? आरं आरं आबा म्हंजे बाबा हा टोल फ्री रस्ता आहे. आताच तर आण्णांनी हजारदा उपोषण करून हा रस्ता टोल फ्री केला होता ना?

**पेंद्या:** मला आबा म्हणू नका, बाबा म्हणू नका, दादा अजि....बात म्हणू नका. मी आघाडीचा किंवा युतीचा पुढारी नाही. मी सरकारी शेवक आहे. (बोलण्याचा बाज पुणेरी आणून) आणिं हां रस्तां मुंबई-पुण्यांसारखां अजूनहीं टोंलवालांच आहें. याचां वापर करणाऱ्यांना टॅक्स द्यांवांच लागतों.

**(तेव्हढ्यात किसनदेव तेथे येतात.)**

**पेंद्या:** द्येवा ओ द्येवा, किसनद्येवा, या गवळणी मावशीसंग त्यांच्या सामानासुमानासहीत या रस्त्यानं जात आहेत अन् टॅक्सबी भरत नाहीत.

**किसनदेव:** काय ग मावशे, हा पेंद्या काय म्हणतो आहे? काहीबी झालं तरी तुम्हाला टॅक्स द्यावाच लागेल. टॅक्सचे पैसे नसतील तर थोडं दूध द्या, दही द्या. अन् ते माठ खाली ठेवा आधी. किती वेळ समईसारख्या उभ्या राहाल. उगाच मानेला आकडी यायची अन् मानमोडी व्हायची.

**(गवळणी डोक्यावरचे माठ खाली ठेवतात.)**

राधाः पण आम्ही टॅक्स दिलाच नाही तर काय करशील रे किसना? सोड आम्हाला. वेळ होतोय बाजाराला.

किसनदेवः आम्ही तुम्हाला काहीबी करू, खटला भरू, पण टॅक्स काही चुकणार नाही. तो तर द्यावाच लागल.

मावशीः राधे, अग ह्य असं नाही ऐकायचा. तू हो मागं. मीच बघते तो काय म्हणतो ते. का रे बाबा, आधीच बाजाराला जायाची येळ निघून गेलेली. आजकाल पब्लीक मॉलमधेच जातयं माल घ्यायला. मग बाजारात कुत्रंतरी सापडंल का आमचा माल घ्यायला? अन् त्ये परराज्यातले भैये लोकं तर आधीच येतात माल विकायला. सोड आम्हाला.

किसनदेवः बरं बरं, तुमची इच्छा दही दूध देण्याची नसेल तरीबी ठीक आहे. तुम्ही मग एखादी गौळण गावून नाचून दाखवा. मग आम्हाला आमचा कर मिळाला असं आम्ही समजू. अन् त्या बदल्यात कराचे पैसे आमच्या खिशातून सरकारी खजिन्यात जमा करू.

राधाः ठीक आहे. आम्ही एक गौळण म्हणतो. पण त्यानंतर तरी आम्हाला लवकर सोड.



**गौळणः**

**(राधा अन् इतर गवळणी 'हाळीची गौळण' सुरू करतात)** ***('हाळीच्या गौळणीलाच' बाजाराची गौळण समजले जाते.)***

**हाळीची गौळणः**

का रे वाट अडवितो नंदाच्या कान्हा
आम्हा जावू दे ना, जावू दे ना, जावू दे ना ।।धृ।।
दूध दही लोणी घेवून डोई
भार आता मला साहवेना
आम्हा जावू दे ना, जावू दे ना, जावू दे ना ।।१।।
राहिले गोकूळ दूर, जवळ नाही बाजार
उगाच छेडाछेडी करू नको ना
आम्हा दे ना, जावू दे ना, जावू दे ना ।।२।।
ठाऊक आहे मला, लोणी निमित्त तुला
आम्हा पासून दूर राहवेना
हे खरे ना, खरे ना, खरे ना ।।३।।
का रे वाट अडवितो नंदाच्या कान्हा
आम्हा जावू दे ना, जावू दे ना, जावू दे ना ।।धृ।।

**राधाः** कृष्णा, नंदाच्या कान्हा आम्ही साऱ्यांनी तुला ओळखलं आहे. आता तरी आम्हाला सोड.

**(त्यानंतर राधा "राधा-कृष्णाच्या ओळखीची गौळण" म्हणते)**

**ओळखीची गौळणः**

असा काय करशी तू रे नंदाच्या कान्हा
उगा खोड्या काढी मज सोड ना ।।धृ।।
गोड बोलणे तुझे लाघवी
यमुनातीरी वेणू वाजवी
करशी मग तू रे बळजोरी
मीही सांगे यशोदेला तुझा खोटा गुन्हा ।।१।।
दह्यादूधाचे विरजण लावले
लोणी सारे विकण्या निघाले
वाट अडवण्या आडवा येई
उपकार कर माझ्यावरती आता जावू दे ना ।।२।।
तुझ्या रुपात एकरूप झाले
माझे मी पण हरवून गेले
उरला नाही भेद कसला
कोण गौळण कोण कान्हा ओळखू येईना ।।३।।

**राधाः** कान्हा, मनमोहना आम्हा साऱ्यांना तुझी खरी ओळख पटलेली आहे. तू केवळ वाट अडवणारा नाही तर वाट दाखवणारा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. लोणीरूपी आमचे जीवनच तू मागत आहे. तुझ्या भक्तीमध्ये आम्ही लीन होतो.

(राधा "भक्तीची गौळण" म्हणते)

**भक्तीची गौळण:**

नको रे कान्हा आडबाजूला भेटुनी
नको लगट दावू उगीचच खेटूनी ॥
नार मी भोळी साधी सरळ हरणी
रस्त्याने जाई येई सलज्ज तरणी
सख्यांसवे मथुरा बाजारी निघाले
अडवूनी दूध दही नको घेवू लुटूनी ॥

गोरी माझी काया तू रे सावळा
मनात दुजे काही चेहेरा भोळा
नको छेडाछेडी दिसे मग साऱ्यांना
ओढताच वस्त्र अंगचे गेले सुटूनी ॥

श्रीहरी मनमोहन कृष्णा रे मुकूंदा
केशव मुरलीधर माधवा गोविंदा
अनंत नावे तुझी येती माझ्या मुखी
विनवीते गौळण पाया तुझ्या पडूनी ॥

तुझ्याविण दुजे माझे आहे सांग कोण
तुझ्याविण जग सारे होई वैराण
यमुनेच्या वाळवंटी जीवन मज सापडले
तुझ्यासवे त्यात गेले चिंब न्हाऊनी ॥

**राधा:** कन्हैया, कृष्णा, मनमोहना, अरे मला ही माया नको. मोह नको. या मोहमयी दुनियेपासून मला आता विरक्त कर.

**(राधा विनवणीची गौळण म्हणते.)**

**विनवणीची गौळणः**

राधा गौळण विनवणी करते कृष्णाची;
राधा गौळण मी मथुरेची ।।धृ।।
दूध दही करण्यासाठी; बाजारी मथुरेच्या नेण्यासाठी
पहाटेच उठुनी धारा काढीते गार्यींची ।।१।।
गोपीकांना सवेत घेवूनी; यमुना तिरावर रास खेळूनी
वाट पाहते नंदलालच्या मुरलीची ।।२।।
मायेच्या पाशात न शिरण्या; मोहांपासूनी विलोभी होण्या
आस लागली तुझ्या न् माझ्या मिलनाची ।।३।।

**(गौळण संपते)**

**मावशीः** ए बायांनो, चला ग. आधीच उशीर झाला. ते माठ उचला अन् चला बिगी बिगी बाजारला.

**(सर्व गवळणी माठ उचलतात अन् बाजाराला निघतात.)**
**(सगळे जण विंगेत जातात)**

## (प्रवेश पहिला)

**शाहीर रंगमंचावर येतात व गातातः**

जगामध्ये देश होता नाव अवंतीपूर
नगर मोठे सुंदर तेथे उंच उंच गोपूर
कळस सोन्याचा मंदिरांना, तोरणं दारोदार
नक्षीदार दिवे झुंबरं हालती घरोघर ॥

अवंतीपूर देशाचा राजा होता चतुरसेन
दिलदार होता राजा उदार त्याचं मन
पसरली होती जगी किर्ती त्याची महान
कहाणी त्याची ऐका आता देवून तुमचे कान ॥ जी जी जी

सेनापती चतुरांगण होता सैन्याचा प्रमुख
युद्धामध्ये जिंकण्याचा चढता होता आलेख
त्याच्या पदरी होते सांडणीस्वार, हत्ती अन् घोडे
अन् होते हवालदार हातमोडे अन् शिपाई पायमोडे ॥ जी जी जी

**(शाहीर रंगमंचावरून विंगेत जातात)**

**(रंगमंचावर दरबाराचा देखावा उभा केलेला आहे. राजा इकडून तिकडे फेऱ्या मारत आहे.)**

**महाराजः** अजून कसं कोणी दरबारात आलेलं नाही? (हातावर हात मारतो.) श्या.. दरबार म्हणजे झेडपीचं हापीस झालं जणू. राष्ट्रवादावादीच्या घड्याळात दहा वाजून दहा मिन्ट झालीत पण अजून एकबी दरबारी दरबारात नाही? थांबा. मला आता दरबारात पंच कार्ड मशीन नाहीतर अंगठा दाबून हजेरी घेणारं मशीनच बसवावं लागल. (मोठ्याने आवाज देतो) प्रधानजी...ओ प्रधानजी...

**प्रधानजीः** महाराज मुजरा असावा.

**महाराजः** असावा असावा. प्रधानजी, ही काय दरबारात येण्याची वेळ झाली का? आता दहा वाजून गेले तरीबी दरबारात कोणीच कसं नाही. अन् तुम्हीसुद्धा लेट झालात? आता एक करा. केजरीवाल ब्रांडचे दोन झाडू आणा. एक तुम्ही घ्या अन् एक माझ्या हातात द्या. अन् करू सुरूवात आपण दोघं दरबाराच्या साफसफाईला.

**प्रधानजीः** बरं महाराज.

**महाराजः** अरे तुम्ही प्रधान आहे का बारदान? मै क्या बोल रहा हूं, तू क्या बोल रहा है? नया है वह क्या? तुम्ही खुशाल बरं म्हणताय. (हाताच्या पंजाचा अंगठा मुडपून चार बोटे दाखवत) काय थोडी लाज? थोडी शरम? थोडी नाईन्टी? थोडी क्वाटर?

**प्रधानजीः** चालेल ना! चालेल!

**महाराजः** अरे काय हे? थोडीतरी लाज, शरम वाटती का?

**प्रधानजी (नाराज होत):** अहो महाराज, तुम्ही मला लेट झाल्याचे विचारलं त्याला मी बरं, चालेल म्हणलो. खरं का नाही? सांगा तुम्ही.

**महाराजः** प्रधानजी, अहो हे सगळं राज्य आम्ही आमचे वडील गेल्यावर लहानपणापासून नेटानं सांभाळलं, कष्टानं वाढवलेलं आहे. राज्यकारभारापायी शिक्षण काही घेता आलं नाही. त्यामुळं भाषा, वागणं काही सुधारलं नाही बघा. राज्याच्या काळजीनं मी तसं म्हणालो तर त्यात काही वाईट वाटून घेवू नका.

**प्रधानजीः** मला सगळं माहित आहे महाराज. मी बी तुमच्यासारखाच आहे म्हणा की. माझ्या सासऱ्यानं शिकू दिलं असतं तर मी बी शिक्षण करून कुठं तरी चांगली नोकरी केली असती. काही नाही तर नाशिक महानगरपालिकेत तरी भरती झाला असतो. विशेष अनुषेश भरून काढला असता.

**महाराजः** बापानं नाही? सासऱ्यानं म्हणजे?

**प्रधानजी:** अहो महाराज, लहाणपणापासून मी घरजावई आहे ना. म्हणून तसे म्हटलो. जावू द्या महाराज. दरबाराचं कामकाज सुरू करायचं का?

**(तेवढ्यात तेथे हवालदार हातमोडे अन् शिपाई पायमोडे येतात. शिपाई आल्या आल्या "इन्ही लोगोंने...इन्ही लोगोंने"गाण्याच्या चालीवर मुजरा डान्स करायला सुरूवात करतो. हवालदार त्याला अडवतो अन् ते दोघे विनोदाने केवळ हाताचा पंजा खालीवर करून मुजरा करतात.)**

**हवालदार हातमोडे अन् शिपाई पायमोडे:** मुजरा महाराज. महाराजांचा विजय असो.

**महाराज:** असो असो.

**शिपाई:** महाराजांचा विजय असो.

**महाराज:** असो असो.

**शिपाई:** महाराजांचा विजय असो.

**महाराज:** अरे असो असोना.

**शिपाई:** असोना तर असोना. महाराजांचा विजय असोना.

**प्रधानजी:** जावू द्या महाराज. फार हुशार माणूस आहे. बाहेरून एमपीएससी परीक्षेची तयारी करतो आहे. हे झेड.पी. बिड पी., नगरसेवक नको. डायरेक मंत्रालयच.

**महाराज:** बरं जावू द्या. काय प्रधानजी, राज्याची हालहवाल कशी काय आहे?

**प्रधानजी:** (हवालदाराकडे पाहत) काय हो हवालदार, कशी काय आहे राज्याची हालहवाल?

**हवालदार:** शिपाई पायमोडे, हालहवाल राज्याची काय कशी आहे?

**शिपाई:** (स्वगतः मायला लईच हालहाल दिसतेय), ठीक आहे, हवालदार साहेब.

**हवालदार:** ठीक आहे, प्रधानजी.

**प्रधानजी (महाराजांकडे पाहून):** राज्याची हालहवाल ठीक आहे, महाराज.

**महाराजः** बरं काही चोरीमारी, खून, दरोडे?

**प्रधानजीः** काय हातमोडे, काही चोरीमारी, खून दरोडे?

**हवालदारः** काय रे पायमोडे, काय चोरीमारी, खून, दरोडे?

**शिपाईः** अजिबात नाही, हवालदारसाहेब.

**हवालदारः** अजिबात नाही, प्रधानजी.

**प्रधानजी (महाराजांकडे पाहून):** नाही महाराज, अजिबात नाही.

**महाराजः** अरे मग काही बलात्कार, विनयभंग तरी असेल की? नाही ते युपी-बिहारीवाले लयी जास्त झालेत इथं म्हणून विचारतो?

**प्रधानजीः** हवालदार, काय बलात्कार, विनयभंग?

**हवालदारः** शिपाई पायमोडे, काय बलात्कार, विनयभंग याची नोंद?

**शिपाईः** नाही साहेब, काहीच नाही.

**हवालदारः** नाही अजिबात नाही, प्रधानजी.

**प्रधानजी (महाराजांकडे पाहून):** अजिबात नाही, महाराज.

**महाराजः** अरे हे काय चाललं आहे? मी प्रधानजींना विचारतो अन् माझी आरडर लगेच खाली खाली जाते. मग शिपायालाच मी विचारतो डायरेक. तुमच्या मधल्यांचं काय काम रे?

**प्रधानजीः** अहो महाराज, यालाच तर संसदीय लोकशाही म्हणतात. फार आदर्श राज्यप्रणाली आहे ती. वरपासून फकस्त आरडरीच द्यायच्या. (स्वगत) काम काहीच नाही.

**महाराजः** काय बोललात काय तुम्ही?

**प्रधानजीः** काही नाही, काही नाही, म्हटलं गुन्हे काहीच नाही महाराज आपल्या राज्यात.

**महाराजः** असो असो. म्हणजे राज्याची हालहवाल एकदम बेस आहे तर.

**हवालदार:** हो महाराज. एकदम बेस आहे. सगळीकडे आबादी आबाद आहे. पाऊसपाणी अमाप आहे. ४० पाण्याचे टँकर भाड्याने लावले आहेत. चोरी, दरोडे, खून काहीच नाही. आणखी १० तुरुंगांना मंजुरी दिली आहे. रोगराई, आजारपण नावालाही नाही. आणखी ३० सरकारी दवाखाने ग्रामीण भागात काढायचे आहेत. गावात मारामाऱ्या दंगली अजिबात नाही. तंटामुक्ती अभियान जोरात चालू आहे. लोकसंख्या नियंत्रणात आहे. नसबंदीसाठी माणसं गोळा करायला डॉक्टर लोकं गावोगाव वणवण फिरत आहेत. शिक्षण व्यवस्थित चालू आहे. शिक्षक लोकं जनगणनेच्या कामात बिजी हायेत, असलं सगळं ठीक चालू आहे, महाराज.

**महाराज:** असो असो. एकुणच सगळीकडे आबादीआबाद आहे तर. ठीक आहे. प्रधानजी दरबाराच्या मनोरंजनाची काही व्यवस्था आहे का?

**प्रधानजी:** महाराज, राजनर्तिका मैनावती एक लावणी सादर करेल आता.

**महाराज:** मग बोलवा तिला.



**(मैनावती मुजरा करून लावणी म्हणते)**

**लावणीः**

चांदराती माझ्यासंगती हासलं चांदणं
पायी वाजे रुनुझुनु रुनुझुनु पैंजणं ।।धृ।।
रूप माझं कसं दिसंल पाहण्या
तुम्ही समोर धरा नजरेचा आईना
लाज लाजून धुंद झाल्या दाही दिशा
मुक्यामुक्यानं बोलण्यात आली नशा ।।१।।
काल राती तुमी ओठ चावून गेला
भानावर राहणं जमेना बघा मला
तुमी ओ धाडीलं डोळ्यातून आवतण
पलंगावर बसता मनी सुरू झालं रण ।।२।।

**महाराजः** वा वा मैनावती वा. हा घे आमच्या गळयातील कंठा बक्षिसी म्हणून

**(मैनवती मुजरा करून कंठा घेते अन् विंगेत जाते.)**

**महाराजः** चला दरबार बरखास्त करण्याची वेळ झाली. आमचा विचार आहे की विरंगुळयासाठी आम्ही आता शिकारीला निघावं. कसं काय?

**हवालदार आणि शिपाई (दोघेही एकदम):** चला महाराज. आम्ही तर एकदम रेडी आहोत.

**प्रधानजीः** एकदम बेष्ट महाराज. तुम्ही आता शिकारीला गेलंच पाहिजे.

**हवालदारः** महाराज राज्यात बिबट्यांची पैदास लई वाढली आहे. शिकारीसाठी मी तर कवाच बंदूक तयार ठेवलीय. शिकारी कुत्रे, हाकारे एकदम तयारीत आहे. झाडाला एक बिबट्या बांधून ठिवेल आहे. तुम्ही

फकस्त जायचं अन् बिबट्यावर गोळी झाडायची की बास. फोटो काढायसाठी प्रेस फोटोग्राफरबी रेडी आहे. बातमीचा मसुदाबी रेडी आहे. तर केव्हा निघायचं महाराज?

**महाराजः** आम्ही आता राणीसाहेबांकडे जातो. थोडी विश्रांती घेतो. अन् मग परवा तेरवा निघुया शिकारीला. काय घाई आहे?

**शिपाईः** महाराज मी बी येवू का तुमच्या संगती रंगमहालात. जरा शेवा करावी म्हनतो मी राणीसाहेबांची...

**महाराज (रागाने):** शिपाया, काय बोलतो तू?

**शिपाईः** अहो महाराज, 'राणीसाहेबांची अन् तुमची शेवा' असं म्हणनार होतो मी. मी तुमचा नोकर आहे ना? मग तुमची सेवा करावीच लागंल मला. (लाडीकपणे म्हणतो) असं नाय करायचं जा बाबा तुम्ही. तुम्ही पुर्ण बोलूच देत नाही बघा. आम्ही नायी जा.

**('अंग थरथरलं गं नजरंनं बाई, पाव्हणं तुमची नजर साधी न्हाई, असं इथंतिथं बघनं बरं हाय का, आम्ही नायी जा..' या 'आयडियाची कल्पना' चित्रपटातील लावणीवर नाचतो. हवालदार त्याला अडवतो.)**

**शिपाईः** काये की गानं लईच भारी आहे म्हणून म्हटलं. क्षमा असावी महाराज.

**महाराजः** असावी असावी.

**शिपाईः** असावी तर असावी महाराज. (स्वगतः आमचं काय जातंय?)

**महाराजः** हवालदार, चला तर तुम्ही व्हा पुढे अन् शिकारीची तयारी करा. आम्हीबी निघतो आता. आताचा दरबार बरखास्त करण्यात येत आहे.

**(सगळेजण महाराजांना मुजरा करतात.)**

**(हवालदार, शिपाई एका विंगेतून जातात तर दुसऱ्या विंगेतून महाराज जातात.)**

(प्रधानजी रंगमंचावर स्वगत बोलत आहेत.)

प्रधानजी (स्वगत): जा जा महाराज तुम्ही शिकारीला जा, राणीसाहेबांकडे जा. तेवढाच वेळ आम्हाला आमच्या चाली खेळण्यात मिळतो आहे. आत्ताच उग्रसेन राजाला निरोप पाठवतो अन् त्याला सांगतो की अवंतीपुरवर आक्रमण करण्याला हीच योग्य संधी आहे.

(प्रधानजी रंगमंचावरून विंगेत जातात.)





**शाहीर रंगमंचावर येतात व गातातः**

चतुरसेनाची पत्नी होती निताराणी सुंदर
अप्सराच जणू स्वर्गीची आली पृथ्वीवर
नाकीडोळी नीट तिचे, केस मोठे भरदार
साडीचोळी नेसून ती चाले डौलदार
चतुरसेन, निताराणी राहती नेहमी बरोबर
जीव लावी एकमेकां, प्रेम दोघांचे एकमेकांवर ॥

चतुरसेनाला होता पुत्र नाव त्याचे शूरसेन
राजपूत्र देखणा होता नावाप्रमाणे शूर
लढाई, घोडेस्वारी, भालाफेक, तलवार
साऱ्या विद्या अवगत, होता त्यात माहीर
होता तो युवक वय त्याचं वीस
हजर राही दरबारी बघे कामकाज ॥ जी जी जी

**(शाहीर रंगमंचावरून विंगेत जातात.)**

**(हवालदार व शिपाई फिरत फिरत रंगमंचावर येतात.)**

**शिपाईः** हवालदार साहेब, असं आपण कुठं फिरून राहिलो भटक्या कुत्र्यावानी? महानगरपालिकेवाले लोकं आले तर नसबंदीसाठी उगाच पकडून घेवून जातील तुम्हाला. अन् मग माझ्यावरच पुढची सगळी जाबाबदारी येईल ना?

**हवालदारः** अरे शिपाया! काय मुर्खासारखं बोलतोय? अरे, आपले महाराज गेले विश्रांतीला. मग आपली डूटी चालू होते का नाही? आपण सरकारी माणसं. ते बी राजाच्या दरबारची. काही उगाचच्या उगाच नाही फिरत आपण. आपण फिरतो त्याला गस्त म्हणतात. आपण गस्त घालत आहोत गस्त. समजलं काय?

**शिपाई कवायत करत चालीत गातोः**

गस्त घालतो आम्ही हो, गस्त घालतो गस्त ॥
शिस्तीमध्ये गस्त घालुनी पाय दुखतात मस्त ॥
गस्त घालतो आम्ही हो, गस्त घालतो गस्त ॥
गोधडीमध्ये गरम करूनी झोपा तुम्ही सुस्त ॥
हो, गस्त घालतो आम्ही हो, गस्त घालतो गस्त ॥
गस्त घालतो गस्त हो, गस्त घालतो गस्त ॥
गस्त गस्त गस्त गस्त गस्त गस्त गस्त ॥

**(दमल्यासारखे करतो...)**

**हवालदार (हुकूम सोडतो):** परेड थांब! तुझ्यायला मावशी म्हणू, अरे शिपाया थांब.

**शिपाईः** (दमून थांबत) बाब्बो, लई दमलो! बरं मी काय म्हणतो, असं फिरून फिरून माझ्या कमरेचं .. स्वारी...स्वारी...माझ्या पायाचं हाड पार मोडलंय बघा. कमरंचं हाड रातीला दुखंतं. तरी म्हटलं अशी बोलण्यात चूक का होवू राहिली? अन् बरं का, मला लई भूकबी लागलेली आहे. मी त्या समोरच्या हाटेलीत जातो अन् 'काही शिळंपाकं असंल तर वाढ रे बाबा' ओरडतो.

**हवालदारः** अरे पायमोड्या, अरे तू सरकारी माणूस असूनही भीक मागतो पोटासाठी? (पाय वर करत) हाणू का तुझ्या गा...

**शिपाई (हात पाठीमागे धरून सावरतो):** ए बाब्बो!

**हवालदार (शिपायाच्या पार्श्वभागावर लात मारण्याचा अभिनय करत):** हाणू का तुझ्या गालावर एक चापट? आँ?

**शिपाई (एक हात गालावर आणि दुसरा हात पाठीमागे नेत 'नको नको' चा अभिनय करत):** ओ सायेब, मागल्या सहा महिन्यापासून

तुम्ही आमचा नाष्ट्याचा अलाउंस, टीए, डीए पास केलेला नाही अन् मग आम्ही नशापाणी....आयमाय स्वारी...आपलं नाष्टापाणी कसा करावा?

**हवालदारः** अरे तो अलाउंस पास करणं काय माझ्या हातात आहे का? आपलं प्रधानजी कसं बेरकी हायेत ते तुला चांगलंच ठाऊक आहे. तरी बरं, माझ्या शिफारसीवरून येळेवर पगार तरी होतात. बरं ते जावू दे. मी काय म्हणतो, मलाबी लय भूक लागलेली आहे. मी समोरच्या हाटेलीत जातो अन् शिववडा खातो, तू बाजूच्या हाटेलीत जा, कांदेपोहे खावून अन् मटणाचं सूप पिवून लगेच ये.

**शिपाईः** वा वा वा असं कसं? तुम्ही येगळी डिश अन् मी येगळी डिश कशी खाणार? मी काय म्हणतो त्या माकडोनाल हाटेलीत पिझ्झा लई भारी मिळतो म्हणे. चला तिथंच जावू आपण दोघंबी! राज्याचा बिल्ला दाखवून काहीतरी सवलत तरी मिळंल.

**हवालदारः** काय काय म्हणालास हाटेलीचं नाव? माकडोनाल? परत एकदा बोल बरं.

**शिपाईः** अहो हेच की. आपलं माकडोनाल हाटेल.

**हवालदारः** अरे काही शाळा कालेजात गेला होता का नाही कधी? का डायरेक भर्तीच? अरे बाबा ते माकडोनाल नाही मॅकडोनाल्ड आहे ते नाव.

**शिपाई (मोठ्याने घोकतो):** मॅकडोनाल...मॅकडोनाल....

**हवालदारः** राहू दे मॅकडोनाल्ड ट्रंपायमोड्या, राहू दे. मेंदू थकेल तुझा अशानं. आरं आरं बाबा, पिझ्झा बर्गर खावून आपल्या ढेऱ्या सुटतील ना? मग डूटी कशी करता येईल? (छताकडे पाहत नमस्कार करत बोलतो) आरारर आबा म्हणायचे की पोलिसांच्या ढेऱ्या सुटल्यात, व्यायाम करा म्हणून. लई चांगला माणूस होता. गेला बिचारा. (भानावर

येत) त्यापेक्षा त्या झाडाखालच्या हातगाडीवर झुणकाभाकर लई झ्याक मिळती बघ. अन् आपल्या पगारात तेच बसतंय. चल बाबा, चल लवकर.

**(रंगमंचावर गोल गोल फिरतात. नाष्टा करून परत येतात.)**

**शिपाईः** मी काय म्हणतो हातमोडे साहेब, नशापाणी करून...स्वारी..स्वारी...नाष्टापाणी करून पोट थोडं जड झालंया. मी घरला जातो अन् विश्रांती घेतो जरा. काये की बायकोबी परवाच माहेराहून आली ना? कटकट करत होती की तुम्ही काय घरला थांबतच नाही, तुम्ही काय घरला थांबतच नाही म्हणून.

**हवालदारः** असं म्हणतो? ठीक आहे तर मग. मी पण मैनावतीकडे जावून थोडा श्रमपरिहार करतो. मस्टरमधी मात्र डूटी केली असं लिही. उद्याच्याला मी सही करतो. (विंगेत जातो)

**शिपाईः** ठीक आहे तुम्ही मोठे लोकं. तुम्ही श्रमपरिहार करा आम्ही घरी फक्त श्रम करतो. म्हणजे धुणी धुणं, भांडी साफ करणं, पाणी भरणं. पाणी नळाचं बरं का.

**(रंगमंचावरून शिपाई दुसऱ्या विंगेत जातो.)**

**(हवालदार हातमोडे मैनावती कडे येतो. दरवाजा वाजवतो.)**

**मैनावती (दरवाजा उघडत):** कोने म्हनायंच? आता ग बया, लय दिवसांनी येळ मिळाला हवालदार सायबांनां?

**हवालदारः** अग मी सरकारी माणूस. आमची डूटी चोवीस तास असते. केव्हा कधी महालातून बोलावणं यायचं त्याचा भरवसा नाही. म्हणून येळ मिळतो तसं दोन घटका करमणुकीसाठी येतो आम्ही.

**मैनावतीः** बसा तुम्ही बसा. (पदराशी चाळा करत लाडीकपणे बोलते) काय च्या पाणी घेणार काय? का काही नाश्टाबिश्टा?

**हवालदारः** च्या पाणी, नाश्टाबीश्टा काही नको आम्हाला. आम्ही

जेवणच करून जाणार आज. लय भूक लागली आम्हाला. झुणकाभाकर खावून कंटाळा आला नुसता.
मैनावती: आस्सं का? तुम्ही बाहेर येगयेगळ्या हाटेलीत खाणारी माणसं. निरनिराळ्या चवीची लई आवड आहे तुम्हाला. आमची चव आवडलं का तुम्हाला?
हवालदार: हाटेलीच खरं आहे मैने. पण मी काय म्हणतो, तुझी...म्हंजी तुझ्या हाताची चव लई निराळी आहे. म्हणून तर आम्ही तुझ्याकडं येतो.
मैनावती: मग तसं असंल तर मी आज माझ्या हातानं सैपाक करते अन् ताट करून भरवते.
हवालदार: ते ठीक आहे ग. पण मी काय म्हणतो, ते जेवायच्या आधी एक फर्मास नाचगाणं होवून जावू दे की? तेवढीच आमची करमणूक.
मैनावती: गाणं ऐकायचं तर माझा पण एक हट्ट आहे. तो पुर्ण करायचा लवकर.
हवालदार: अगं सांग तर खरं कोणता हट्ट आहे आमच्या मैनाराणीचा? नाही पुरवला तर नावाचा हवालदार नाही.
मैनावती: असं म्हणता? ठीक आहे! ऐका तर मग.



**(मैनावती लावणी सुरू करते.)**

**लावणीः**

सांगून सांगून थकले हट्ट माझा पुरवा झणी
आजच आणा मला येवल्याची पैठणी
आजच आणा मला साडी पैठणी ।।धृ।।

जरतारी आसलं काठ तिचा बारीकसर
नक्षी आसलं तिच्यावर बुट्टेदार
लई दिसांची इच्छा आहे मनी
आजच आणा मला येवल्याची पैठणी ।।१।।

आमसूली नाहीतर रंग आणा निळा जांभळा
कसा दिसलं कुणा ठावं? चालंल हिरवा पिवळा
आत्ताच घाई करा अन् लगेच जावा धनी
आजच आणा मला येवल्याची पैठणी ।।२।।

नितळ काया माझी वर तुमची माया
जीव लावायचं शिकावं तुमच्याकडून राया
आहे गरज झाकायची ज्वानी आरसपाणी
आजच आणा मला येवल्याची पैठणी ।।३।।

सांगून सांगून थकले हट्ट माझा पुरवा झणी
आजच आणा मला येवल्याची पैठणी
आजच आणा मला साडी पैठणी ।।धृ।।

**हवालदारः** वा वा एकदम झ्याक मैने, एकदम झ्याक. मग कधी जायचं येवल्याला पैठणी घ्यायला? या रविवारी जमंल ना?

**मैनावतीः** हं चला, जावू ना. पण मी काय म्हनते, लई वेळ झाला. जेवून घ्या आता.

**(स्टेजवर गोल फिरतात. जेवण संपते.)**

**हवालदारः** मैनाबाई, जेवणबी लावणीइतकंच मस्त होतं बघ. कुणी कायबी म्हणो, पन तुझ्या हातची चव कुणाकडं नाही बघ.

**मैनावतीः** चला. आज लईच कौतुक चाललंय तुमचं. जेवण तरं झालं. तो समोरचा पानाचा डबा पुढं ओढा.

**(मैनावती बैठकीची लावणी म्हणू लागते.)**

**बैठकीची लावणीः**

पाच पकवान खावून केलं जेवण
काथ लावून तयार करा हिरवं पान ॥धृ॥
हिरव्या पानाच्या
होऽऽऽ
हिरव्या पानाच्या
शिरा हळूहळू खरडा
देठ शेवटाला लागल तो पण खुडा
तोंडानं म्हणा आपलं खुशीतलं गानं
राया तुमी माजबी लावा की हो पान ॥१॥

पुढं ओढा जरा
होऽऽऽ
पुढं ओढा ना...
डबा पानाचा तुम्हां जवळी
त्यातच ठेवली पहा सुपारी चिकनी
अडकित्यामधी फोडा तिला हाती धरून
पानावर मग पसरा बारीक कतरून ॥२॥

प्रेमाचा गुलकंद लावा तुम्ही पानाला

तयार झाल्यावर हातामधी द्या त्याला


जवळी या आता खावून पान

थांबून जा थोडं मन रिझवून ॥३॥

**हवालदारः** व्वा मैनावती व्वा, पण आता मला निघायला पायजेल. लई वेळ झाला बघ.

**मैनावतीः** आता ग बया. येवढा वेळ झाला व्हय? आज रातीला इथंच थांबून जा ना.

**(मैनावती लावणी सुरू करते.)**



**लावणीः**

अहो पाव्हणं राहून जा की आजच्या रातीला
सोबत व्हईल मला, कुणी दुसरं न्हाय वस्तीला ।।धृ।।

**कोरसः** अहो दाजी हिची इच्छा पुरवा तुमी, ऐका लवकरी, ऐका तिच्या मागणीला अनमान नका धरू, उशीर नका करू, लवकर स्टार्ट करा तुमच्या गाडीला

एकली मी बाईल आहे घरात
कशी मी राहू रात नाही सरत
तुमीच या हो धीर मला द्या हो
कुणी दुसरं नाही बोलायला
सोबत व्हईल मला, कुणी दुसरं न्हाय वस्तीला ।।१।।

चोरचिलटं झाल्यात लई
मागनं शिरन्याचा भरोसा न्हाई
कडीकुलपातला ऐवज जाई
बंदूक राहूद्या तुमची राखणीला
सोबत व्हईल मला, कुणी दुसरं न्हाय वस्तीला ।।२।।

जेवन कराया तुमी लवकर या
तोंड रंगवाया विडा हाती घ्या
रंगमहाल सजवला फुलांनी
छपरी पलंग आहे झोपायला
सोबत व्हईल मला, कुणी दुसरं न्हाय वस्तीला ।।३।।

झोपायची आता करू नका घाई
मी बाई काही पळून जात नाही
गुलूगुलू बोला कानात माझ्या
हात धरा माझा उशीला

सोबत व्हईल मला, कुणी दुसरं न्हाय वस्तीला ॥४॥

**कोरसः** अहो दाजी हिची इच्छा पुरवा तुमी, ऐका लवकरी, ऐका तिच्या मागणीला

अनमान नका धरू, उशीर नका करू, लवकर स्टार्ट करा तुमच्या गाडीला

**(लावणी संपते. माडीच्या खाली गडबड गोंधळ ऐकू येतो.)**

**हवालदारः** मैने, खाली काय गोंधळ चालू आहे गं? नोटबंदीनंतर एटीएम परत सुरू झाले का आदर्श इमारत पाडली का एखादा फ्लायओवर पडला?

**मैनावतीः** या बया? थांबा मी मावशीलाच पाठवते काय खाली काय झालं ते पहायला.

**(मैनाबाई मावशीला काय झाले ते पाहण्यासाठी ओरडत हाक मारत विंगेत जाते. हवालदार रंगमंचावर फिरत असतो. तेवढ्यात मावशी पळत पळत येते अन् हवालदारावर आदळते.)**

**हवालदारः** ये बाबो! काय मावशे, केवढ्यानं आदळलीस तू माझ्यावर! मला वाटलं परत मलेशीयाचं इमान बिमान पडलं की काय?

**मावशीः** अहो हवालदार, बातमीच येवढी भयानक आहे की मला तर काहीच सुचेनासं झालंय. (हवालदाराच्या छातीवर डोकं टेकवते.)

**हवालदार (घाबरून दूर होत):** बरं, बरं, नक्की काय झालं ते चटचट अन् पटपट सांग. उगा काय खटपट करू नको. नायतर पाय लटलट करून ठेवतो. आँऽऽऽ

**मावशीः** अहो व्हायंच काय? आपल्या राज्यावर शेजारच्या उग्रसेन राजानं आक्रमण केलंय. त्याचं सैन्य युद्धासाठी चाल करून येतंय अशी खबर आहे. म्हणून सगळे लोकं खाली चौकात घाबरून जमलीत बरंका.

हवालदार: अरे बाब्बो, ही तर लईच भयानक बातमी आहे. मग हे आधी नाही का सांगायच? मोठाच कठीण प्रसंग आलाय राज्यावर. बहुतेक युद्ध पुकारलं जाणार. आम्हाला युद्धावर निघावं लागेल आता.

(तेवढ्यात मैनावती तेथे येते.)

हवालदार: मैनावती, लवकरच युद्ध होईल अशी शक्यता आहे. आम्हाला युद्धाला निघावं लागेल. चल आम्हाला धिरानं निरोप दे.

मैनावती (रडवेली होत): हं ऐकलंय मी सगळं. हवालदार साहेब, मला तर तुमची लई काळजी वाटते. तुम्ही विजय मिळवून परत या. तवर मी तुमची वाट पाहीन.

(मैनावती लावणी सुरू करते.)



**लावणीः**

सरदार सरदार तुम्ही माझं अंमलदार
काळजी तुमची करते लवकर परतावं ॥धृ॥

सवत चाकरी झाली माझी
ओढून नेई तुम्हा युध्दावर
वाट पाहिल तुमची दारी दासी
सेवा करीते थोडं शेजघरी पडावं ॥१॥

तुम्हावीण व्याकूळ चिमणा जीव
काय घडलं तेथे कुणी सांगावं
मन लागेना कामी दिसभर
घास जाईना ओठी काय करावं ॥२॥

धीर करून देते निरोप आता
माझी काळजी आहे उलीशी
देशराज्याचा पसारा मोठा
पुऱ्या ताकदीनिशी युध्द लढावं ॥३॥

चला नाही अडवीत, तुम्ही जावं
तेज तलवारीनं दुश्मना मारावं
मस्तकी मोती शिरपेच खोचावं
विजयी विराला पंचारतीनं ओवाळावं ॥४॥

**हवालदारः** मैनावती तू काळजी करू नको. लवकरच आम्ही परत येवू.

**(हवालदार निरोप घेवून एका विंगेत तर मैनावती, मावशी दुसऱ्या विंगेत जातात.)**

**(दरबाराचा देखावा. दरबारात महाराज, प्रधानजी, हवालदार, शिपाई, राणी, राजपूत्र, सेनापती चतुरांगण आदी चिंतीत मुद्रेने एकत्र बसलेले असतात.)**

**महाराजः** उग्रसेन राजानं अवंतीपूरवर आक्रमण केलं आहे. उग्रसेन ह्या प्रकारे दगा देईल ही शंका कशी आली नाही याचं आम्हाला नवल वाटतं. सेनापती चतुरांगण, तुम्ही हवालदार, शिपाई अन् इतर सैन्याला घेवून राज्याच्या सीमेवर लढाईला निघा. आम्हीबी जातीनं युद्धाला जाण्याची तयारी करतो. आपण सारे मिळून शत्रूशी प्राणपणानं लढू.

**प्रधानजी (मनातल्या मनात):** म्हणे युद्धाला जाण्याची तयारी करतो. हॅं. (उघडपणे मोठ्याने) आपण युद्धाला जाण्याची तयारी करा महाराज, आताच्या घडीला तेच बरोबर आहे. (पुन्हा मनात) आता कशी तयारी करतात तेच बघतो.

**राजपूत्र शूरसेनः** बाबा, आम्हीपण युद्धावर येणार अन् त्या उग्रसेनाचा कायमचा बंदोबस्त करणार. आम्हाला आपल्यासोबत रणांगणावर येण्याची आज्ञा असावी.

**निताराणीः** बाळा शूरसेना, अरे तू अजून लहान आहे युद्धावर जायला.

**राजपूत्र शूरसेनः** नाही आई. आम्ही आज वीस वर्षांचे युवराज आहोत म्हणजे काही लहान नाही. माझ्या हातामध्ये युवासेनेचे बळ आहे ते उग्रसेनाला दाखवतोच.

**महाराजः** शूरसेन, तुझी आई बरोबर बोलत आहे. तू राणीसाहेबांबरोबर इथंच थांब. तुम्हां दोघांसोबत प्रधानजी आहेत. अन् बरं का प्रधानजी, आम्ही परत येईपर्यंत आपल्या राज्याची नीट काळजी घ्या.

**प्रधानजीः** महाराज तुम्ही युद्धाला निवांत मनानं निघा. तुमच्या माघारी आम्ही राज्याची, राणीसरकारांची अन् राजपूत्राची नीट काळजी घेवू. तुम्ही कसलीही काळजी करू नका.

**महाराजः** तर मग आजच युद्धभुमीवर निघायची तयारी करा.
**निताराणीः** काळजी, चिंता, युद्ध देवादिकांनाही चुकलेलं नाही तर आपल्यासारख्या मानवप्राण्यांची काय कथा? पण महाराज, आम्हाला तुमच्या जीवाची फार काळजी वाटते. तुम्ही शत्रूवर विजय मिळवून लवकरात लवकर परत या. विजयानंतर मी तुमची पंचारतीने ओवाळण्याची वाट पाहीन.
**प्रधानजीः** राणीसरकार तुम्ही काहीच काळजी करू नका. आम्ही आहोत ना माघारी. महाराज तुम्ही नक्कीच विजयी होवून परत याल, खरं ना महाराज?
**महाराजः** म्हणजे काय? अगदी जरूर परत येवू. चला तर आम्ही आता लढाईला निघतो. आणि प्रधानजी आमच्या माघारी राज्याची नीट काळजी घ्या. चला येतो आम्ही.

**(सर्व जण महाराजांना मुजरा करतात अन् युद्धभुमीवर निघतात.)**

**(प्रथम प्रवेशानंतरचा पडदा पडतो.)**

**मध्यंतर....**





## (प्रवेश दुसरा)

**शाहीर रंगमंचावर येतात व गातातः**

असा होता क्रौंधनिती, अवंतीपूरचा पंतप्रधान
खल, कपट, क्रूरकर्मा असले होते त्याचे गुण
राजा किर्तीमान पण दुष्किर्ती प्रधानाची
अनितीने तो वागे लुबाडणूक करी प्रजेची ॥

उग्रसेन राजा होता उग्रनगरीचा
शेजार होता त्याला अवंतीपूराचा
कमालीचा उग्र राजा त्याची लई मोठी हाव
जमीनजुमला राज्य वाढवणं हेच त्याला ठाव ॥

आता त्याने रचला अवंतीपूरावर हल्याचा डाव
सैन्याने तयारी केली अन् सुरू केला सराव
हातमिळवणी केली त्याने कपटी क्रौंधनितीशी
भ्रष्ट पंतप्रधान पाडेल का चतुरसेनाला तोंडघशी?

ऐका सज्जन नरनारी तुम्ही बसले सामोरी
वगनाट्य पाषाणभेद शाहीराचे
सादर करतो रंगमंदिरी ॥ जी जी जी

**(शाहीर रंगमंचावरून विंगेत जातात.)**

**(बॅकग्राउंडला तलवारींचा खणखणाट. आरोळया, मारा, तोडा असले आवाज. तोफा बंदूकांचे आवाज होत असतात. एखाद्या मिनिटाच्या अंतराने रंगमंचावर राजा चतुरसेन आणि चतुरांगण, हातमोडे, पायमोडे, अंगरक्षक आदी शत्रूच्या सैन्याच्या गराड्यात आहे असे दिसते. शत्रूसैन्याचा सेनापती त्यांना दोरखंडाने बांधतो.)**

**हवालदारः** अरं मुर्दाडांनो, हिंमत असेल तर मला मोकळं सोडा. मग दाखवतो माझा हिसका. (शत्रूसैन्याकडून सुटण्याचा असफल प्रयत्न करतो.)

**शिपाईः** हवालदार साहेब, अगदी मर्दावानी बोलला तुम्ही. जणू वाघाला जाळ्यात पकडल्यावानी आमची अवस्था केलीया तुम्ही लोकांनी.

**शत्रूसैन्याचा सेनापतीः** ए! गप बसा रे सारे. महाराज चतुरसेन, आमचा विजय झालेला आहे. आम्ही तुम्हाला युद्धकैदी केलेलं आहे.

**चतुसेन महाराजः** अरं हॅट, म्हणे विजय झाला आहे. अजून आमच्या राजधानीत प्रधानजी आणि राजपूत्र शूरसेन बाकी आहेत म्हटलं. ते नक्कीच याचा बदला घेतील अन् आम्हाला सोडवून विजय मिळवतील.

**(तेथेच उग्रसेन राजा टाळ्या वाजवत येतो.)**

**उग्रसेन राजाः** वा वा वा. सेनापती, तुम्ही महाराज चतुरसेनांना कैद करून चांगलं काम केलेलं आहे. आता बाकीची कामगिरी आमचे मांडलीक झालेले अवंतीपूरचे प्रधानजी क्रौंधनिती करतील.

**महाराज चतुरसेनः** काहीही काय बोलत आहात राजे उग्रसेन तुम्ही? बाकीची कामगिरी काय? मांडलीक झालेले अवंतीपूरचे प्रधानजी क्रौंधनिती काय?

**उग्रसेन राजाः** आम्ही बरोबर बोलत आहोत महाराज चतुरसेन. अहो तुम्हाला शिकारी करायचा, बाहेर फिरायचा लई नाद होता. त्यामुळं तुम्हाला तुमच्या राज्याकडं लक्ष देता आलं नाही. म्हणूनच तुमचे प्रधान क्रोंधनिती आम्हाला येवून मिळाले. आम्ही त्यांना आमचं मांडलीक केलेलं आहे. गुमान आता तुम्ही आमच्या तुरूंगाचा पाहुणचार करा. तिकडं तुमच्या राणीसरकार अन् राजपूत्राची काळजी प्रधानजी घेतीलच. चला. तुरूंगात डांबा रे या सगळ्यांना.

**(महाराज चतुरसेन व इतरांना कैद करून सगळे जण रंगमंचावरून विंगेत जातात.)**

**(अवंतीपूरचा महाल. निताराणी खिडकीपाशी काळजीने उभी आहे. राजपूत्र शूरसेन तेथे येतो.)**

**राजपूत्र शूरसेनः** आई, तू का बरं काळजी करतेस? बाबा युद्धावरून लवकरच जिंकून परत येतील. माझा विश्वासच आहे तसा.

**(प्रधान क्रौंधनिती मोठ्यानं हसत हसत तेथे येतो.)**

**प्रधानजीः** हा हा हा हा हा... शूरसेना, अरे तुझे बाबा युद्ध हरले आहेत. त्यांना उग्रसेनाने कैद केलं आहे. अवंतीपूरवर आता माझा ताबा आहे हे ध्यानात ठेव अन् तुम्ही दोघंही माझे कैदी झालात. अवंतीपूरवर आता माझीच सत्ता राहील.

**निताराणीः** अरे निचा. तुझा हा डाव आमच्या लक्षात कसा आला नाही.

**प्रधानजीः** म्हणूनच तुम्ही आमचे कैदी झालात. निघा आता तुरूंगात. तिथे आम्ही तुमची नीट काळजी घेवू.

**राजपूत्र शूरसेनः** प्रधानजी, खाल्या मिठाला तुम्ही जागला नाही. आम्ही तुमचा बदला जरूर घेवू.

**प्रधानजीः** अरे जा जा. अजून तुझे दूधाचे दातही पडलेले नाहीत अन् म्हणे बदला घेवू. कोण हाय रे तिकडे? राणीसाहेबांना अन् राजपूत्रांना कैद करून तुरूंगात डांबा.

**(दोन शिपाई राणीसाहेबांना अन् राजपूत्राला कैद करून घेवून जातात.)**

**राजपूत्र शूरसेनः** हे बरोबर नाही प्रधानजी. आम्ही तुमचा बदला जरूर घेवू हे लक्षात ठेवा.

**(शिपाई राजपूत्राला कैद करून घेवून जातात. राजपूत्र**

**निताराणीबरोबर ओरडत विंगेत जातो. प्रधानजी मोठ्यानं हसत दुसऱ्या विंगेत जातात.)**

**(राजपूत्र तुरूंगात आहे. राणीसरकारही महिलांच्या तुरूंगात आहेत.)**

**(राजपूत्र तुरूंगात. दोन दिवस उलटून गेलेले आहेत.)**

**राजपूत्र शूरसेन (स्वगत):** काहीही करून या तुरूंगातून सुटका करून घेतलीच पाहिजे. काय करावं बरं? काय करावं?

**(दृश्यः तुरूंगातला राजपूत्र रात्री जेवण घेवून येत असलेल्या तुरूंग रक्षकाकडच्या किल्ल्या हिसकावतो त्याला मारून तुरूंगाचा दरवाजा उघडून पळतो. मळलेले कपडे, वाढलेली दाढी अशा अवस्थेत राजपूत्र शूरसेन उग्रनगरीत प्रवेश करतो.)**

**राजपूत्र शूरसेन (स्वगत):** चला एकदाची सुटका करून आपण उग्रनगरीत प्रवेश तर केला आहे. काहीतरी अक्क्लहुशारी दाखवून आता उग्रसेनाच्या महालात प्रवेश मिळवून वडिलांची सुटका करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. सर्वात पहिल्यांदा माझा अवतार बदलून चांगले कपडे घातले पाहिजे.

**(उग्रसेनाचा दरबार. दरबारात मंत्री तसेच उग्रसेनाची मुलगी सुनयना उपस्थित आहेत. राजपूत्र शूरसेन एक शस्त्रविक्रेता बनून आलेला आहे.)**

**राजपूत्र शूरसेनः** मुजरा महाराज. मी शारंगधर, एक शस्त्रविक्रेता आहे. देशोदेशी मी चांगल्या दर्जाची, आधुनिक शस्त्र विकत असतो. आपण माझ्या गोदामातील धारदार तलवारी, ढाली व बंदूका बघण्यासाठी वेळ काढावा महाराज.

**राजा उग्रसेनः** वा वा शारंगधरजी, आम्हाला शस्त्रास्त्रांचा मोठा शौक आहे. पण हे दोन दिवस शक्य नाही. सध्या आमची राज्यविस्तारासाठी महत्त्वाची बैठक आहे. आता तुम्ही आलाच आहात तर दोन दिवस

मुक्कामाला रहा राजमहालात. नंतर आपण तुमच्या शस्त्रास्त्रांचा कोठारावर जावू अन् खरेदी करू. बरं, ही आमची राजकन्या सुनयना. बाळ सुनयना, तू यांची राहण्याची व्यवस्था बघ बरं.

**राजकन्या सुनयनाः** हो बाबा. मी यांची सारी व्यवस्था बघते. चला शारंगधर, तुमच्या विश्रांतीची सोय करून देते.

**(शारंगधर अन् सुनयना आत विंगेत जातात. उग्रसेनाच्या बैठकीचा दरबारातील देखावा दिसत असतांना पडदा पडतो.)**

**(दुसऱ्या विंगेतून शारंगधर (राजपूत्र शूरसेन) व राजकन्या सुनयना येतात.)**

**सुनयनाः** शारंगधर, ही तुमची खोली.

**शारंगधरः** वा वा. एकदम छान आहे ही खोली. पण मी इथं येतांना शिपायाकडून ऐकलं की या खोलीपासून जवळच राजकैद्यांना ठेवण्याचा तुरूंग आहे म्हणे?

**सुनयनाः** काही काळजी करू नका तुम्ही शारंगधर. घाबरू नका. (हसत) अहो ते तुरूंगातले कैदी काय तुरूंग फोडून तुमच्याकडं येणार नाही.

**शारंगधरः** हो, ते पण खरंय म्हणा. पण मी असल्या कैद्यांना थोडा घाबरतो, म्हणून विचारतो आहे.

**सुनयनाः** तुम्ही एक शस्त्र विक्रेता असूनही तुरूंगातल्या कैद्यांना घाबरता! मला खरं वाटत नाही. बरं ठीक आहे. काही लागले तर सांगा. बाजूला नोकर आहेतच तुमच्या सेवेला. येते मी.

**(सुनयना विंगेत जात असतांना स्वतःशी बोलते.)**

**सुनयना (स्वगत):** काहीतरी नक्कीच लपवून ठेवतोय हा. याच्यावर पाळत ठेवली पाहिजे.

**(संध्याकाळी सुनयना नोकराणीचा वेश घेते आणि राजपूत्राच्या खोलीत येते)**

**नोकराणीः** महाराज, जेवण आणलंय. जेवून घ्या.

**शारंगधरः** हं. ठेव तेथे. एक माहिती सांगशिल का?

**नोकराणीः** विचारा महाराज.

**शारंगधरः** एक सांग. या खोलीपासून तुरूंग किती अंतरावर आहे? अन त्या तुरूंगापासून मुख्यद्वार किती अंतरावर आहे?

**नोकराणीः** तुरूंग हाकेच्या अंतरावर तर तेथून मुख्यद्वार दोन फर्लांग आहे, महाराज. महाराज, तुमचे कपडे वैगेरे काहीच दिसत नाही बरोबर?

**शारंगधरः** अग, आम्ही फिरस्ते. आम्हाला कपडेलत्त्यांची काय गरज?

**नोकराणीः** बरोबरच आहे तुमचं, महाराज. दोन दिवस मी तुमच्या सेवेला आहे महाराज. काही लागलं तर मला आवाज द्या. सुमूखी माझं नाव. आपल्या खोलीच्या बाहेरच मी राहीन. येते मी.

**शारंगधर (स्वगत):** हिला काही संशय तर नाही ना आला? फारच चौकस दिसते आहे.

**(रात्री सुमूखी पुन्हा दरवाजावर टकटक करते. शारंगधर दरवाजा उघडतो. सुमूखी सरळ आत येते.)**

**शारंगधर (गडबडीने):** अरे अरे हे काय? अन् हातात ती फुलं कसली?

**सुमूखीः** काही नाही महाराज. मी तुमच्यासाठी ही फुलं आणली होती. घ्या ना.

**शारंगधरः** अगं ह्या अवेळी फुलं वैगेरे काय? कुणी बघेल ना.

**सुमूखीः** हे हो काय महाराज. फुलांना कुणी नाही म्हणतं काय?

**शारंगधरः** बरं बरं. ठेव त्या फुलदाणीत.

**सुमूखीः** महाराज, एकटं एकटं वाटतंय का? की कुणाची आठवण येतेय. उदास दिसताय अगदी.

**शारंगधरः** उदास नाही ग सुमूखी. माझ्या आईवडिलांची आठवण येतेय मला. कसे असतील ग ते?

**सुमूखीः** का काय झाले तुमच्या आईवडिलांना? काही काळजीचे कारण?

**शारंगधरः** काही नाही, तुला नाही कळणार माझी व्यथा. ते जावूदे. तुझे लग्न झाले का ग सुमूखी? अन तुझे आईवडील काय करतात?

**सुमूखीः** नाही महाराज. माझे लग्न अजून व्हायचेय अन माझी आई माझ्या लहानपणीच गेली. माझे वडिल याच राजवाड्यात महाराजांचे सेवक आहेत. पण माझी आई गेल्यापासून त्यांचे माझ्याकडे लक्ष नसते. एकटी एकटी पडलेय मी. एक विचारू? आपले लग्न झालेय महाराज?

**शारंगधरः** नाही सुमूखी. सध्या मी पण माझ्या आईवडीलांपासून एकटाच राहतो. माझंही अजून लग्न व्हायंचं आहे. हं... म्हणजे आपण दोघंही समदुःखीच आहोत तर.

**सुमूखीः** तर तर. तसंच म्हणा पाहिजे तर. अरे बाप रे. फारच वेळ झाला मला. येते मी.

**(सुमूखी जाते. बाहेरील विंगेत सुमूखी स्वगत म्हणते)**

**सुमूखी(स्वगत):** खासच, हा काही शस्त्रविक्रेता वाटत नाही. माझी तर खात्रीच झालीये. पण रंगरूपाने छान आहे. बाबा उगाचच त्या म्हाताऱ्याशी लग्न करून देत आहेत माझं. मला असलाच पती मिळावा असे मला वाटते. का मला यांच्याबद्दल प्रेम वाटत आहे? चला. मलाच यातून मार्ग काढला पाहिजे.

**(सुमूखी एक स्वप्नात असल्यासारखी लावणीवर नाच करते.)**

**लावणीः**

नक्षीदार कुयरी पदरावरची....
हळद कुंकवानं भरलेली
सोळा सिणगाराचा साज लेवूनी....
ऐन्यापुढे उभी मी राहीली

पुढ्यात तुमच्या जवळ आले माळून मी मरवा
लग्नाचं वय माझं झालं; आता तारीख ती ठरवा ।।धृ।।

मुसमुसलेली ज्वानी माझी कळीदार ती काया
हाताला हात लावा अन पारखून घ्या तिला राया
अंग माझं सोन्यावानी तिस हजारी की हो झालं!
चांदीवानी चमचम करूनी उजळून ते आलं
तुमच्या मुठीत घ्या या रुप्याच्या रुपाला
लग्नाचं वय माझं झालं; आता तारीख ती ठरवा ।।१।।

पावसाळ्यामदी मोरलांडोरी पान्यामधी भिजती
झाडावरती राघू मैना घरट्यामधी लपती
आणि किती गोष्टी सांगू; गोड गोष्टीत रंगत आणाया
थंडी वाजूनी आले जवळी अंगी उबारा घ्यायला
जावू नका दूर आसं; गोड घासानं तोंड माझं भरवा
लग्नाचं वय माझं झालं; आता तारीख ती ठरवा ।।२।।

**(लावणी संपते अन् सुमूखी स्वप्नातून जागी होत विंगेत जाते.)**

**(दुसऱ्या दिवशी सकाळी सुमूखी जेवण घेवून येते तेव्हा...)**

**सुमूखीः** महाराज, जेवण आणलेय. जेवून घ्या. (अडखळत बोलते) अं..महाराज राग येणार नसेल तर एक विचारू?

**शारंगधर (घाबरत):** अं..अगं राग कसला. बिनधास्त विचार जे काही विचारायचं ते.

**सुमूखीः** तुम्हाला पाहिल्यापासून मला एक शंका येते आहे. तुमच्या बोलण्यावरून अन् दिसण्यावरून तुम्ही काही शस्त्रास्त्रांचे व्यापारी दिसत नाही. तुम्ही खरंच कोण आहात? माझ्यावर विश्वास ठेवा अन् खरं ते सांगा महाराज.

**शारंगधरः** सुमूखी, आता तुला खरं सांगयला काही हरकत नाही. मी तुमच्या शेजारच्या राज्याचा, अवंतीनगरीचा राजपूत्र शूरसेन आहे. तुझ्या वडिलांनी आमच्या राज्यावर हल्ला केला अन् माझ्या वडिलांना त्यांच्या अंगरक्षकांसहीत कैद केलं. तिकडे आमचे प्रधानजी तुमचे मांडलीक झाले अन् त्यांनी मला व माझ्या आईला कैद करून तुरूंगात टाकलं. एके दिवशी तुरूंगातून मी स्वतःची सुटका केली अन् इथे आलो. आता माझं एकच धेय्य आहे. माझ्या वडिलांची सुटका करायची. त्यानंतर आईची सुटका करून आमचं राज्य मला परत मिळवायचं आहे.

**सुमूखी (नोकराणी असल्याची वेशभूषा अंगावरून उतरवत सुनयनाच्या वेशात परत येत):** शुरसेनजी, मी सुनयना. तुमच्या रूपाबद्दल मला सुरूवातीपासून शंका येत होती. म्हणून वेश बदलून दोन दिवस मी तुमच्या सेवेत राहिले. दरबारात पाहिल्यापासून तुम्ही मला आवडला आहात. माझ्या वडिलांना संपत्तीचा, जमीनजुमल्याचा फार हव्यास आहे.  दुसऱ्या एका शेजारच्या राजाची संपत्ती मिळवण्यासाठी त्यांनी माझा विवाह एका म्हाताऱ्या राजाशी करून देण्याचा हट्ट धरला आहे. मी तुम्हाला मदत करण्यास तयार आहे. तुमच्या वडिलांची सुटका करण्यात मी तुम्हाला मदत करते. आजच रात्री मी तुरूंगाच्या किल्ल्या मिळवते व तुमच्या वडिलांची आणि इतरांची सुटका करते.

**राजपूत्र शूरसेनः** वा वा. सुनयना तू म्हणजे चोरावर मोरच झाली जणू. माणसाचा हेतू चांगला असला की देव त्याला मदत करतो असे म्हणतात. तुझा मला मिळालेला पाठिंबा पाहून मला तसेच वाटत आहे.

मी मध्यरात्री मुख्यद्वाराजवळ थांबतो. तिथंच तुम्ही सारेजण या. आणखी एक, मलासुद्धा तुझा उमदा स्वभाव आवडला आहे. तू आमच्याबरोबर अवंतीपूरला आलीस तर मला आनंद होईल. आपलं लग्न तेथेच व्हावं अशी माझी इच्छा आहे. तुझी काही हरकत तर नाही ना?

**सुनयनाः** माझी कसलीच हरकत नाही. तुमच्यासारखा शूरवीर राजपूत्र मला पती म्हणून मिळतो आहे हा खूप मोठा आनंद आहे. नंतर मी माझ्या वडिलांची समजूत घालीनच. ठरले तर मग. आज रात्री ठीक बारा वाजता मी तुमचे वडील व इतरांना घेवून मुख्यद्वाराजवळ येते. तुम्हीपण तिथंच तयारीत थांबा. आता तुम्ही आराम करा. येते मी.

**(सुनयना, शूरसेन वेगवेगळ्या विंगेत जातात.)**

**(त्याच रात्री सुनयना राजा चतुरसेनाची त्याच्या अंगरक्षकांसहीत सुटका करते व ते सगळे मुख्यद्वाराजवळ येतात. राजासहीत साऱ्यांचे कपडे फाटलेले आहेत. दाढ्या, डोक्याचे केस वाढलेले आहेत.)**

**सुनयनाः** शूरसेनजी, ठरल्याप्रमाणे मी तुमच्या वडीलांची सुटका केली आहे.

**राजपूत्र शूरसेनः** बाबा!! (आनंदानं त्याच्या वडिलांना मिठी मारतो.) चला बाबा, आता तुमची सुटका झाली आहे. लवकरात लवकर आपण सगळे वेशांतर करून अवंतीपूरला निघू या. तिकडे भ्रष्ट प्रधानाने आईला तुरूंगात डांबलेले आहे. तिची सुटका केली पाहिजे.

**महाराजः** काय, क्रोंधनितीनं राणीसरकारांला तुरूंगात टाकलेलं आहे? हा अस्तनीतला निखारा आपलाच वैरी झाला. त्या नीच, पाजी, हरामखोर प्रधानाचा चांगलाच बदला घेवू. अन् काय रे, आमची सुटका करणारी ही मुलगी कोण आहे?

**राजपूत्र शूरसेनः** बाबा, ही उग्रसेनाची मुलगी आहे. घाबरू नका. ती आपल्याला सामील आहे. बाकीची गोष्ट नंतर रस्त्यात सांगतो. आता

आपल्याला वेळ वाया घालवायचा नाही.

**हवालदारः** चला चला महाराज. आपण त्या प्रधानाचा बदला घेतलाच पाहिजे. त्या दगाबाजामुळंच हे सगळं झालंय. तेज्ञ्यायला...मावशी म्हणू.

**शिपाईः** चला महाराज, मलाही माझा टीए, डीए, जेवणाचा भत्ता मंजूर न केल्याचा बदला घ्यायचा आहे. लयी त्रास दिला त्या प्रधानानं.

**(सर्वजण विंगेत जातात.)**

**(दृश्यः वेशांतर केलेल्या साध्या मळक्या वेशात सारे जण- महाराज, राजपूत्र शूरसेन, राजपुत्री सुनयना व चतुरसेनासहीत अंगरक्षक, हातमोडे हवालदार, पायमोडे शिपाई अवंतीपूरला येतात. राजमहालात प्रवेश करतात.)**

**प्रधानजी (महाराजांना ओळखून)ः** हे काय! महाराज तुम्ही कैदेतून सुटून आलेले दिसतात! (तलवार काढतो.)

**महाराज (तलवार काढत चवताळून)ः** कपटी प्रधाना, आता तुझा खेळच संपवतो.

**राजपूत्र शूरसेनः** याचा वध माझ्याच हातून लिहिलेला आहे. तुम्ही बाजूला व्हा बाबा.

**(शूरसेनाची प्रधानाशी लढाई होते. त्या लढाईत शूरसेन प्रधानाला ठार करतो.)**

**राजपूत्र शूरसेनः** बाबा, आता कपटी प्रधान क्रौंधनितीचा वध झालेला आहे. लगेच चला. आपण तुरूंगात असलेल्या आईची सुटका करण्यास जावू. शिपायांनो, धावत जा आणि तुरूंग आपल्या ताब्यात घ्या.

**महाराजः** शूरसेना, आज तू या प्रधानाचा वध करून आपल्या राज्याच्या वाटेवरच्या वैऱ्याचा भेद केला आहे. आज मला तुझा अभिमान वाटतो आहे. आता लगेचच शत्रूसैन्याला सीमेपार करण्याची हालचाल केली पाहिजे. सेनापती, आपल्या तसे सैन्याला आदेश द्या.

**(सर्वजण विंगेत जातात.)**

**(महाराजांचा दरबार. महाराज चतुरसेनासहीत सारे जण राजवेशात. सुनयना आणि निताराणी देखील आहे.)**

**चतुरसेनः** चला शेवटी सगळे एकत्र झाले. आपलं राज्यही पुन्हा आपल्याला मिळलं. राजपूत्र शूरसेना, हे सगळं तुझ्या चतुरपणामूळं अन् शूरपणामूळं झालेलं आहे.

**निताराणीः** एकदम बरोबर आहे महाराज. आपला मुलगा शूर आहे, हुशार आहे. अक्कलहुशारीनं त्यानं सगळं जमवून आणलेलं आहे. पण ही मुलगी कोण आहे ते सांगशील का नाही?

**राजपूत्र शूरसेनः** आई मी काही सगळं जमवलेलं नाही. हे सगळं या मुलीनं जमवून आणलं आहे. ही शेजारच्या राजाची म्हणजे आपल्या शत्रूची मुलगी सुनयना.

**निताराणी (आश्चर्याने):** काय आपला शत्रू असणाऱ्या उग्रसेनाची मुलगी! अन् ती येथे कशी?

**चतुरसेनः** आम्ही सांगतो राणीसरकार. अहो ह्या सुनयनाने अन् शूरसेनाने एकमेकांशी सूत जमवले. या दोघांनी आम्हा साऱ्यांची सुटका केली. त्यानंतर आम्ही इथं आल्यानंतर शूरसेनाने भ्रष्ट प्रधानाचा वध केला. तुमची सुटका केली. अन् बरं का राणीसरकार, आता हे दोघं लग्न करणार आहेत.

**हवालदारः** मग राणीसरकार, आहे की नाही हुशार तुमचा मुलगा अन् सून!

**निताराणीः** मग आहेच माझा मुलगा अन् सून हुशार. बरोबर आहे ना महाराज? चला एखादा चांगला मुहूर्त पाहून लग्न उरकून टाकू दोघांचं.

**चतुरसेनः** नाही आजिबात नाही. सुनयना एका राजपूत्राबरोबर लग्न करणार नाही.

**सगळेजण (आश्चर्याने चतुरसेनाकडे पाहत बोलतात):** काय?

**चतुरसेनः** बरोबर ऐकलंय तुम्ही साऱ्यांनी. शुनयना केवळ एका राजपूत्राबरोबर लग्न करणार नाही तर ती (राजपूत्राकडे हात दाखवून) एका राजाबरोबर लग्न करून या राजाची राणी होणार आहे. (सगळयांकडे बघत) तुम्ही सगळे माझ्याकडे का बघतात? अहो, लग्नाच्याच दिवशी राजपूत्र शूरसेनाचा आम्ही आधी राज्याभिषेक करणार आहोत अन् त्यानंतर तो राजपूत्राचा राजा होईल आणि त्याच्याशी राजपुत्री सुनयनाचं लग्न होईल.

**(सगळेजण वा! वा! म्हणत अनुमोदन करतात.)**

**शिपाईः** काय महाराज, म्हणजे राज्याभिषेकाची मिठाई अन् लग्नाचे लाडू एकाच दिवशी का? नाही म्हणजे वेगवेगळ्या दिवशी हे समारंभ ठेवले असते तर दोन दिवसांची जेवायची सोय झाली असती. काय?

**(सगळे जण हसत हसत असतांना पडदा पडतो. प्रवेश संपतो)**

**(उग्रसेनाचा दरबार. एक शिपाई सुनयनाच्या लग्नाची बातमी आणतो.)**

**उग्रसेनाचा शिपाई (मुजरा करत)ः** महाराज महाराज, राजपुत्री सुनयना अवंतीपूरला आहेत अन् अवंतीपूरचा राजपूत्र शूरसेनाशी लग्न करणार आहे अशी खबर आहे.

**उग्रसेनः** काय! सुनयना अन् शूरसेनाचं लग्न! आमचा तर विश्वासच बसेनासा झालाय. सुनयना पळून गेली हे एकवेळ ठीक होतं पण थेट शूरसेनाशीच लग्न! नाही...नाही..(उद्विग्न होतो)....मी काय ठरवलं अन् काय झालं....

....हं.... (पश्चातापाने) बाकी तिचंच बरोबर आहे म्हणा. मी मुर्खपणामुळं अन् संपत्तीच्या हावेमुळं तिचं लग्न शेजारच्या म्हाताऱ्या राजाशी लावून देत होतो. मला माझ्या मुर्खपणाची लाज वाटते आता. ते काहीही असो. माणसाच्या संपत्तीच्या हावेला अंत नसतो त्याचप्रमाणे एखाद्या

शत्रूवरही प्रेम होवू शकते. प्रेमाला देशाची सीमा नाही हेच खरं. चला माझी एकुलती एक मुलगी सुनयना चांगल्या राजघराण्यात पडली हाच आनंद आहे.

......(हाक मारतो) दिवाणजी....ओ दिवाणजी....

**दिवाणजी:** जी महाराज....

**उग्रसेन:** आताच्या आता अवंतीपूरला निरोप पाठवा. त्यांना सांगा की आम्हाला आमच्या वागणुकीचा पश्चाताप झालेला आहे. आमचं राज्य आम्ही अवंतीपूरात विलीन करत आहोत अन् राजपूत्र शूरसेनाचा जावई म्हणून स्विकार करत आहोत. त्यांना असाही सांगावा धाडा की, हा शानदार लग्नसमारंभ आमच्या उग्रनगरीतच होईल म्हणून.

**(दरबारातील सगळेजण आनंदाने अन् आश्चर्याने महाराजांकडे पहातात.)**

**दिवाणजी:** जशी आपली आज्ञा महाराज.

**उग्रसेन:** चला तर मग सगळेजण झाडून लग्नाच्या तयारीला लागा. बाकीच्या साऱ्या राज्यांना लग्नाचं निमंत्रण पाठवा. आपल्या राज्यातली सगळी प्रजा लग्नाला हजर पाहिजे. काय हवे काय नको ते सारं तुम्ही जातीने पहा दिवाणजी. चला लागा कामाला.

**दरबारातील सगळे जण:** महाराजांचा विजय असो!

**(दरबारी मुजरा करतात अन् राजासह सारेजण विंगेत जातात.)**

**(विंगेतून सगळे कलाकार रंगमंचावर येतात. त्यात राजपूत्र शूरसेन व सुनयना वधुवराच्या वेशात आहेत. गळयात फुलांच्या माळा आहेत. सर्व कलाकार भैरवी होत असतांना हात जोडून उभे राहतात.)**

**भैरवी:**

देवा गणेशा, नमन करतो,
आशीर्वाद तुम्ही द्या द्या द्या द्या ॥
कलावंत आम्ही, कला सादर केली
गोड मानुनी घ्या घ्या घ्या घ्या ॥

**(भैरवी होत असतांना पडदा पडतो)**

**समाप्त.**




## परिशिष्टः

आणखी काही गण, गवळण आणि लावण्या खालीलप्रमाणे आहे. प्रसंगानुरूप त्या म्हणता येतील.

### १) गणः आमच्या गणाला गणपती आले

आमच्या गणाला गणपती आले
वंदन करूनी मस्तक झुकले ।।धृ।।
रिद्धीसिद्धीचा स्वामी तू गणपती
शरण आलो आम्ही अल्पमती
कार्यारंभी दावुनी उपस्थिती
दयाबुद्धीने आम्हा पाहिले
आमच्या गणाला गणपती आले ।।१।।
कलाकारां होवोनी स्फुर्ती
जगावेगळी मिळण्या किर्ती
कला आगळी सादर करण्या
कलाकार सारे एकच झाले
आमच्या गणाला गणपती आले ।।२।।
सारी विघ्ने गेली सारूनी
संकटे सारी गेली हारूनी
पुढला अंक सुरू कराया
गणात नमन गणाला केले
आमच्या गणाला गणपती आले ।।३।।

## २) गणः वंदन करीतो गजाननास

यावे गणास गणपती आज
नमन करीतो आम्ही तुम्हास
रसिक जमले तुमचा भास
होवू द्या गौळणवग खास
वंदन करीतो गजाननास ॥धृ॥
कार्यारंभी वंदन करूनी
गणास आळवी शुभशकूनी
हाती घेतली डफतुणतूणी
द्यावा आशीर्वाद आम्हांस
वंदन करीतो गजाननास ॥१॥
सरस्वतीचे लेणं लिहूनी
गान मंदिरी गाणं गावूनी
नम्र होवूनी तिजला वंदूनी
विनवितो आम्ही बुद्धी देवीस
वंदन करीतो गजाननास ॥२॥
कला आमची रसिका दाखवाया
भाग्यवंत पुण्यवंत आम्ही ठराया
लवकर येवूनी आम्हास पावा
गणात नित्य भजतो तुम्हास
वंदन करीतो गजाननास ॥३॥

## ३) गणः करू या वंदन गणरायाला

करू या वंदन गणरायाला
गण वगाचा सुरू कराया ।।धृ।।
हाती धरूनी पंचारती
रिद्धीसिद्धी तुज ओवाळीती
जाणूनीया तुझीया किर्ती
आलो आम्ही तुझ्या पूजेला ।।१।।
कार्यारंभी तुजला वंदीती
भय नच आता नच दुष्किर्ती
रसिक समोरी मोदे बसती
झडकरी या या शुभलाभाया ।।२।।
करू या वंदन गणरायाला
गण वगाचा सुरू कराया ।।धृ।।

### ४) गणः गणेशा वंदन तुजला आता

गणेशा वंदन तुजला आता
तुझ्या चरणी ठेवीतो माथा ।।धृ।।
कुशल बुद्धीचे दैवत तू रे
आम्हां मुढास सुबुद्धी दे रे
सुगम होवूदे गौळण वग कथा
गणेशा वंदन तुजला आता ।।१।।
मुर्ती तुझी तुंदील तनू हासरी
आनंदे भरती येई बघता नाचरी
नृत्य गायने हरू दे रसिक व्यथा
गणेशा वंदन तुजला आता ।।२।।
कला चौसष्ट चौदा विद्या
पारंगत असशी विघ्नहर्ता
सफल कार्य होई **गण** तुला अर्पीता
गणेशा वंदन तुजला आता ।।३।।

## ५) गणः जय जय लंबोदरा

जय जय लंबोदरा
आदिदेव तू विद्यासागरा
लवकरी ये संकटहरा
जय जय लंबोदरा ।।धृ।।
विनंती आमची तुझीया ठायी
करीतो आर्जव नमितो पायी
सकल कार्य नेई सिद्धीस
आशीर्वाद देण्या त्वरा करा ।।१।।
रूप अन गुण तुझे कितीक वर्णू
मुढ बालके आम्ही, तू कृपासिंधू
फळ द्यावया कष्टास आमच्या
करीतो आम्ही तुझा पुकारा ।।२।।

## ६) गवळणः कान्हा रे कान्हा

(चाल १):
दही विकाया गोपी निघाल्या मथूरेच्या बाजारी
वाट अडवून कान्हा बसला म्हणे दही कर द्यावा करी
प्रिती पाहूनी कान्हाची आपल्यावरी
गोपिका त्या वरवर रागावती
लटका लटका नकार देती परी मनी सुखावती ॥
वाट अडवूनी कान्हा त्यांची छेड काढी
कारण करूनी कान्हा मडके फोडी
कान्हा मडके फोडी ॥
(चाल बदलून):
कान्हा रे कान्हा असे काय करी
दूधा दह्याचे मडके असे का फोडी
फोडीलेस तर सोडीव मज ती गोडी ॥धृ॥
विरहाची सवय होत असतांना
मला तुझ्याकडे पुन्हा का ओढी?
ओढीत असता वस्त्रे न माझे फेडी ॥२॥
कान्हा रे कान्हा असे काय करी
दूधा दह्याचे मडके असे का फोडी ॥धृ॥
संसारी या पडता मी रे विसरले तुला सख्यारे
तू छेडीता सूर मुरलीवरी रे छेडीलेस तू पुन्हा मला रे
छेडाच्या खेळात दंग, संसारी एकटी का सोडी ॥२॥

## ७) लावणीः रंगपंचमीच्या सणाला

नका भिजवू शालू वेल बुट्टेदार नऊवारी
रंगपंचमीच्या सणाला नका मारू पिचकारी ।।धृ।।
नेम तुमचा कधी का चुकतो!
अंगाला बाई असा झोंबतो
पाण्याचा तो मारा; नका करू मजवरी
रंगपंचमीच्या सणाला नका मारू पिचकारी ।।१।।
रंग हवेत* कितीक उडवीले (*हवे ते)
फुगे फोडीले हिरवे पिवळे
रंगात येवूनी का गुलाल फेकीला अंगावरी?
रंगपंचमीच्या सणाला नका मारू पिचकारी ।।२।।
लाज मला हो आली भारी
सर्व सख्यांनी मस्करी केली
उगीच तुम्ही जवळ येवूनी केली बळजोरी
रंगपंचमीच्या सणाला नका मारू पिचकारी ।।३।।

## ८) लावणी: वेळ लावू नका

रात नवेली आली चालून
विडा ठेवला चुना लावून
तुमच्या येण्याचा नाही भरवसा
वेळ लावू नका बिगीनं या राजसा ।।धृ।।
वाट तरी पहावी कितीक बाई
दिस गेला ही रात सरत जाई
ऐन मोक्याला धोका कसला?
जीव झाला येडापीसा
वेळ लावू नका बिगीनं या राजसा ।।१।।
लाडीगोडीचं तुमचं बोलणं
गोडगुलाबी कोडं घालणं
आधारासाठी हात उशाला
पांघराया अंग द्या न विसरता
वेळ लावू नका बिगीनं या राजसा ।।२।।
शिनगाराचा असल्या येळी
आठव तुमची डोळा आली
दोन्ही पापण्या न्हाती पाणी
विरह सहन होईना जरासा
वेळ लावू नका बिगीनं या राजसा ।।३।।

## ९) लावणीः या हो या हो पाव्हणं तुम्ही

या हो या हो पाव्हणं तुम्ही जरा जवळ बसा
माझ्या जीवाची उलघाल जरा तुम्ही पुसा ।।धृ।।
दिवसा ऱ्हाती तुमची घाई
जरा बोलाया वेळच न्हाई
कसं व्हाव मग मन मोकळं
नका वेळ वाया घालू फुका
माझ्या जीवाची उलघाल जरा तुम्ही पुसा ।।१।।
मी बाई राही एकटी घरात
दिस सरून जाई सरेना रात
सोबतीला तुम्ही या हो
तग धरला कसाबसा
माझ्या जीवाची उलघाल जरा तुम्ही पुसा ।।२।।
थोडं मी बोलते थोडं तुम्ही बोला
दिसभराची ख्याली विचारा
रात आपलीच आहे विसरू नका
माझ्या जीवाची उलघाल जरा तुम्ही पुसा ।।३।।

अमीगो पी.ओ.डी. बूक पब्लिशर इंडिया, लवकरच
लेखक-कवी पाषाणभेद - सचिन बोरसे यांच्या रचना - हास्यकविता,
भक्तिगीते, कथासंग्रह इ. प्रकाशित करत आहे.


**Amigo POD Book Publisher India**
**Email: AmigoPublisher@gmail.com**
**Mobile: 9403043782**

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.**

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

हवालदारः काय रे पायमोडे,
काय चोरीमारी, खून, दरोडे?
शिपाईः अजिबात नाही हवालदारसाहेब.
हवालदारः अजिबात नाही प्रधानजी.
प्रधानजी (महाराजांकडे पाहून): नाही महाराज, अजिबात नाय.
महाराजः अरे मग काही बलात्कार, विनयभंग तरी असेल की?
नाही ते युपी-बिहारी लयी जास्त झालेत
इथं म्हणून विचारतो?

पेंद्याः इश्टाप! इश्टाप!! इश्टाप!!!
मावशीः ए मुडद्या काय "इश्टाप इश्टाप इश्टाप" करतोया?
इथं काय लपाछपीचा खेळ चालू आहे का?
पेंद्याः "इश्टाप इश्टाप इश्टाप" म्हंजे इंग्रजीत "Do not start".
मी बी आता 'हासुरे' झटपट विंग्रजीचा क्लास लावलेला आहे सध्या.
गवळणः ये बाबा काय 'मन की बात करतोय' त्या मोदीवानी? जरा माय
मराठीत समजल असं बोल. नायतर मनसे बोलाया लावीन बघ.
पेंद्याः अग बायांनो, मराठीत बोलतो,
"थांबा! थांबा!! थांबा!!"

लावण्य, भावभक्ती, विनोद, संगीत, शौर्य, चातुर्य आणि प्रेम यांचा संगम असलेले तसेच गण, गौळण, बतावणी, लावणी आणि तमाशा वग यांनी युक्त असलेले लोकनाट्य संपूर्णपणे नव्याने लिहून आपणापुढे सादर.

**ISBN: 978-93-5267-770-2**
**Lok-Natya: Vairi Bhedala Arthat Premala Seema Nahi**
Category: Comedy-Folk Drama
Publication:
Amigo POD Book Publisher India
email: AmigoPublisher@gmail.com

Price: Rs. 65/-

ISBN 978-93-5267-770-2
9 789352 677702